# शिव



1969-70

संपादक :

प्रा. मधु कुळकर्णी.

श्री. वीरेंद्र पाटील

( विद्यार्थी

BHOSALE.M.B

## ...क - वर्ग

...य : अंबादास दिगंबर माडगूळकर.

...विभाग : प्रा. के. एच. मबियार.
प्रा. व्ही. एम. पाटील.

मराठी विभाग : प्रा. व्ही. बी. कुलकर्णी.
प्रा. के. एस. गुरव.

अर्थशास्त्र विभाग : प्रा. आर. बी. अणेकर.
प्रा. एस. टी. जाधव.

राज्यशास्त्र विभाग : प्रा. एन.एस. कुलकर्णी.

इंग्रजी विभाग : प्रा. आर. जी. पातकर.
प्रा. जी. आर. ठाणे.

मानसशास्त्र व
तर्कशास्त्र विभाग : प्रा. बी. के. सोरटे.

वाणिज्य विभाग : प्रा. एम. एस. डेढानकर.
: प्रा. एम. एल. पाटील.
: प्रा. पी. जी. दिवाण.
: प्रा. डी. के. दंडगे.

भूगोल विभाग : प्रा. एस. एस. जोशी

ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

## शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज

# शिवराज

## १९६९ – ७०

❁ संपादक मंडळ ❁

अध्यक्ष : प्राचार्य अंबादास माडगूळकर

प्रमुख संपादक : प्रा. मधु कुळकर्णी

हिंदी विभाग : प्रा. के. एच्. मनियार

इंग्रजी विभाग : प्रा. जी. आर. ठाणे

विद्यार्थी प्रतिनिधी : श्री. वीरेंद्र पाटील

मुखपृष्ठ व सजावट : श्री. मारुती भोसले

तेथे कर माझे जुळती ॥



कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथराव पाटील

जन्म : २८–४–१९१०

मृत्यु : १८–७–१९६९

यांच्या मंगल स्मृतीस हा अक सादर समर्पण.



संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष : श्री. व्ही टी. पाटील

लोकप्रिय नगराध्यक्ष व संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष



डॉ. एस्. एस्. घाळी

# आमचे प्राध्यापक



प्रा. एम्. एल्. पाटील, प्रा. गुरव, प्रा. जाधव, प्रा. डेहानकर, प्रा. अणेकर, प्रा. मनियार, प्राचार्य माडगूळकर, प्रा. व्ही. बी. कुळकर्णी,
प्रा. सोरटे, प्रा. व्ही. एम्. पाटील, प्रा. ठाणे, प्रा. एन्. एस्. कुलकर्णी.

वक्तृत्व, व्यासंग आणि कवित्व...



प्राचार्य अंबादास दिगंबर माडगूळकर.

# आमचे कार्यालयीन कर्मचारी



बसलेले : श्री. तोरगल्ली, श्री. मडलगी, श्री. सबनीस, प्राचार्य माडगूळकर, सौ. सबनीस, श्री. वड्डी, श्री. गवळी

# संपादकीय :

**आदरांजलि :** यावर्षीचे 'शिवराज' आपल्या हाती देत असताना सुखदुःखाच्या अनेक आठवणी मनात उचंबळून आल्या आहेत. या अभ्यासवर्षातच ताराराणी विद्यापीठाच्या उपाध्यक्ष व संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. व्ही. टी. पाटील यांच्या पतिपरायणा पत्नि सौ. सरोजिनीदेवी ऊर्फ काकी या आम्हास सोडून गेल्या. सर्वजण त्यांना 'काकी' म्हणत. सौ. काकींनी उभे जीवन ताराराणी संस्थेसाठीच खर्च केले. मृत्यूपूर्वी आपली सर्व लौकिक जायदाद त्यांनी 'ताराराणी'ला दान करून टाकली. त्यांच्या मृत्यूने माननीय श्री. व्ही. टी. पाटील ऊर्फ 'काका' हे तर पोरके झालेच आहेत. पण काकांच्या सर्व संस्थाहि आता मातृसुखाला अंतरल्या आहेत. सौ. काकी म्हणजे आदर्श हिंदु स्त्री होत्या. त्यांची उणीव आम्हा सर्वच सेवकवर्गाला दीर्घकाल जाणवत राहील. म्हणूनच अत्यंत आदरपूर्वक हा अंक आम्ही त्यांच्या स्मृतीस अर्पण केला आहे.

सात सप्टेंबर १९६९ रोजी आमच्या संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष डॉ. एस्. एस्. धाळी यांच्या भगिनी सौ. मालुताई प्रभाकर कंगुरी यांच्या निधनाची दुःखद वार्ता ऐकून आम्हा सर्वांना फार मोठा धक्का बसला. डॉक्टर साहेबांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

**शिक्षणक्षेत्रांत रमलेले सन्माननीय श्री. व्ही. टी. पाटील :** सौ. काका हे एक जिद्दीचे राजकारणी होते. परन्तु गेल्या कांही वर्षात राजकारणाच्या क्षेत्राला कायमचा रामराम ठोकून ते आता आपल्या आवडीच्या शिक्षणक्षेत्रात रमले आहेत. अहर्निश कोणत्या ना कोणत्यातरी संस्थेच्या कामकाजाचे कागद काकांच्या पुढ्यात असतात, मंडळी येत असतात, चर्चा झडत असतात, नवनव्या योजना आखल्या जात असतात, नवी स्वप्ने रंगवली जात असतात. सौ. काकींच्या उठाउठी निघून जाण्याने वरील कार्यक्रमात किंचित् व्यत्यय आला. परंतु पुरातले दुःख उरात ठेवून काका पुन्हा कर्तव्याकडे वळले आहेत. लौकिक संसाराचा पाश काकांनी कधीच जुमानला नव्हता. आता तर घरट्यातील पक्षिणी उडून गेली आहे. काका आता संस्थांच्या कामातच अधिक अधिक रस घेतात. "तुका म्हणे आता । उरलो फक्त उपकारा पुरता" अशीच त्यांची मुक्त अवस्था झाली आहे. 'शिवराज' महाविद्यालयाच्या इमारतीचा ध्यास आता त्यांनी घेतला आहे. हे स्वप्न पुरे केल्याखेरीज काका आता थांबणार नाहीत असाच निष्कर्ष आजवरच्या अनुभवातून निघतो. परहितासाठी, रंजल्यागांजल्यासाठी उभे जीवन खर्च करणाऱ्या या थोर पुरुषाला मदत करण्याची बुद्धि परमेश्वराने आम्हा सर्वांना द्यावी हीच एक अपेक्षा आहे.

# संपादकीय :

**आदरांजलि :** यावर्षीचे 'शिवराज' आपल्या हाती देत असताना सुखदुःखाच्या अनेक आठवणी मनात उचंबळून आल्या आहेत. या अभ्यासवर्षातच ताराराणी विद्यापीठाच्या उपाध्यक्ष व संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. व्ही. टी. पाटील यांच्या पतिपरायणा पत्नि सौ. सरोजिनीदेवी ऊर्फ काकी या आम्हास सोडून गेल्या. सर्वजण त्यांना 'काकी' म्हणत. ती. काकींनी उभे जीवन ताराराणी संस्थेसाठीच खर्च केले. मृत्यूपूर्वी आपली सर्व लौकिक जायदाद त्यांनी 'ताराराणी'ला दान करून टाकली. त्यांच्या मृत्यूने माननीय श्री. व्ही. टी. पाटील ऊर्फ 'काका' हे तर पोरके झालेच आहेत. पण काकांच्या सर्व संस्थाहि आतां मातृसुखाला अंतरल्या आहेत. ती. काकी म्हणजे आदर्श हिंदु स्त्री होत्या. त्यांची उणीव आम्हा सर्वच सेवकवर्गाला दीर्घकाल जाणवत राहील. म्हणूनच अत्यंत आदरपूर्वक हा अंक आम्ही त्यांच्या स्मृतीस अर्पण केला आहे.

सात सप्टेंबर १९६९ रोजी आमच्या संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष डॉ. एस्. एस्. धाळी यांच्या भगिनी सौ. मालुताई प्रभाकर कंगुरी यांच्या निधनाची दुःखद वार्ता ऐकून आम्हा सर्वांना फार मोठा धक्का बसला. डॉक्टर साहेबांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

**शिक्षणक्षेत्रांत रमलेले सन्माननीय श्री. व्ही. टी. पाटील :** ती. काका हे एक जिद्दीचे राजकारणी होते. परन्तु गेल्या कांही वर्षात राजकारणाच्या क्षेत्राला कायमचा रामराम ठोकून ते आता आपल्या आवडीच्या शिक्षणक्षेत्रात रमले आहेत. अहर्निश कोणत्या ना कोणत्यातरी संस्थेच्या कामकाजाचे कागद काकांच्या पुढ्यात असतात, मंडळी येत असतात, चर्चा झडत असतात, नवनव्या योजना आखल्या जात असतात, नवी स्वप्ने रंगवली जात असतात. ती. काकींच्या उठाउठी निघून जाण्याने वरील कार्यक्रमात किंचित् व्यत्यय आला. परंतु पुरातले दुःख उरात ठेवून काका पुन्हा कर्तव्याकडे वळले आहेत. लौकिक संसाराचा पाश काकांनी कधीच जुमानला नव्हता. आता तर घरट्यातील पक्षिणी उडून गेली आहे. काका आता संस्थांच्या कामातच अधिक अधिक रस घेतात. "तुका म्हणे आता । उरलो फक्त उपकारा पुरता" अशीच त्यांची मुक्त अवस्था झाली आहे. 'शिवराज' महाविद्यालयाच्या इमारतीचा ध्यास आता त्यांनी घेतला आहे. हे स्वप्न पुरे केल्याखेरीज काका आता थांबणार नाहीत असाच निष्कर्ष आजवरच्या अनुभवातून निघतो. परहितासाठी, रंजल्यागांजल्यासाठी उभे जीवन खर्च करणाऱ्या या थोर पुरुषाला मदत करण्याची बुद्धि परमेश्वराने आम्हा सर्वांना द्यावी हीच एक अपेक्षा आहे.

**उदार, दिलदार व समर्थ डॉ. एस्. एस्. घाळी :** आपल्या विलक्षण बुद्धीने काकांनी जी अनेक लहान थोर माणसे जवळ केली त्यापैकी डॉ. एस्. एस्. घाळी हे एक आहेत. डॉ. घाळींचे सामर्थ्य मोठे आहे. गडहिंग्लजसारख्या ग्रामीण भागात काकांनी संस्था काढली ती डॉ. घाळींच्या सहकार्यावर विसंबूनच. काकांची निवड किती योग्य होती याचे प्रत्यंतर गेल्या सहा वर्षात सर्वांना आलेच आहे. डॉक्टर साहेबांचा व्याप मोठा आहे. राजकारण, समाजकारण इत्यादि सर्व क्षेत्रात डॉक्टरसाहेब रमतात. उदार व दिलदार स्वभाव, माणसे पारखण्याची हातोटी व स्पष्टवक्तेपणा यामुळे डॉक्टरसाहेब गडहिंग्लज भागात लोकप्रिय आहेत. त्यांचे मार्गदर्शन शिवराज महाविद्यालयातील प्राध्यापकांना मिळत आहे ही गोष्ट भाग्याची आहे. डॉक्टरसाहेबांनी आपल्या भोवती सहकारी मित्रांचे मंडळ निर्माण केले आहे. त्यांचीहि मदत महाविद्यालयास वारंवार होत असते.

**प्राचार्य अंबादास माडगूळकर :** या वर्षीच्या सुरवातीपासून प्राचार्यपदाची धुरा संस्थेतील एक नामवंत प्राध्यापक श्री. अंबादास दिगंबर माडगूळकर यांनी संभाळली आहे. एकेका नावाचे जातकच असे असते की त्यांच्या लेखणीच्या प्रत्येक हुंकाराला सरस्वतीचे वरदान असते. माडगूळकर या नावाचे साहित्याशी असेच नाते आहे. हाडाचे कवी असलेले अंबादास माडगूळकर व्यवसायाने समाज शास्त्राचे व्यासंगी प्राध्यापक आहेत. वक्तृत्व ही त्यांना मिळालेली एक देणगी आहे. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली कॉलेजची नक्कीच भरभराट होईल याबद्दल खात्री वाटते.

आमचे महाविद्यालय अगदी ग्रामीण भागात आहे. सारा दहा बारा हजार लोकवस्तीचा छोटासा गाव. साधारणतः सुशिक्षित मनुष्याने प्रथम दर्शनी प्रतिकूल मत करून घ्यावे अशी भौतिक परिस्थिती. परंतु तरीहि गेल्या सहा वर्षात हे महाविद्यालय नेटाने वाढले आहे, विकास पावले आहे, साडेचारशे विद्यार्थ्यांनी गजबजून गेले आहे. संस्थेच्या धोरणाप्रमाणे ग्रामीण भागातील मुले व सर्वच थरातील मुली यांना या महाविद्यालयात विशेष अगत्याने वागविले जाते. हे महाविद्यालय नसते तर या भागातील वरील घटकांना पदवी घेण्याचे भाग्य कधीच लाभले नसते. व हीच संस्थेच्या यशाची फार मोठी बाजू आहे.

**अभ्यासक्रमाची वाटचाल :** महाविद्यालयात जुने व जाणते प्राध्यापक आहेत. त्याचप्रमाणे नवीन व होतकरू प्राध्यापकहि आहेत. विद्यार्थी व प्राध्यापक यामधील नाते महाविद्यालयापुरते सीमित नसते. बाहेरच्या समाजातहि या उभयतांचे सहकार्य आढळून येते. अर्थशास्त्र, हिंदी व मराठी या तीन विषयांचे पदवीपर्यंतचे शिक्षण आमच्या महाविद्यालयात दिले जाते. या तीनहि विषयांचे आजवरचे निकाल स्पृहणीय आहेत. विषयांची वाढ दिवसेंदिवस अधिक होत आहे विद्यार्थ्यांच्या निवडीला अधिक व्यापक क्षेत्र उपलब्ध करून दिले जात आहे. वाणिज्य विभाग हा या महाविद्यालयात विशेष लोकप्रिय आहे. आजवर अनेक निष्णात प्राध्यापक मिळाल्यामुळे या विभागाची लोकप्रियता वाढतच राहिली आहे.

**कॉलेजची शान वाढविणारा राजा खोत :** यंदाच्या शैक्षणिक वर्षात राजा खोत याने महाविद्यालयाला नेत्रदीपक यश मिळवून दिले. आंतरविद्यापीठीय सामन्यापर्यंत त्याने दौड मारली होती. धावण्याच्या शर्यतीतील विद्यापीठातील कित्येक उच्चांक त्याने मोडले. आमच्या महाविद्यालयाचे नाव शिवाजी विद्यापीठाच्या क्षेत्रात सर्वतोमुखी होण्यास राजा कारणीभूत झाला. त्याच्या यशाचा आम्हा सर्वांस अभिमान वाटतो. मैदानी खेळात आमची मुले आंतरविभागीय सामन्यापर्यंत पोहोचली होती. आर. बी. पाटील व एम्. एन. म्हाडी यांनीहि धावण्याच्या शर्यतीत नंबर पटकाविले आहेत. त्याचप्रमाणे रजपूत, आर. एम्. देसाई, बी. एस्. मोहिते, एस्. एम्. पाटील, मगदूम आणि बापू फडणीस हेहि विभागीय स्पर्धांमध्ये चमकले. फुटबॉल व कबड्डी यांचे संघ विभागीय स्पर्धांसाठी पाठविण्यात आले होते.

**विविधांगी विकास :** महाविद्यालयामध्ये अनेक क्षेत्रात हिरीरीने भाग घेणारी, कर्तृत्व दाखविणारी मुले व मुली आहेत. चित्रकार व कवी म्हणून सर्वांस परिचित असलेला मारुती भोसले, कवयित्री कुंदा पेडणेकर, नकालाकार कोठीवाले अभिनयामध्ये गुण दाखविणारी खेबूडकर भावंडे, महाविद्यालयाच्या सर्व कार्यक्रमात अग्रभागी असणारे राम जोशी, बापू फडणीस, हरिभाऊ चव्हाण, सुभाष आजरी, सुळकुडे, राजा शित्रे ही काही नावे ताबडतोब स्मरणात येतात. सहज आठवली म्हणून वरील नावांचा उल्लेख केला. एरव्ही सर्वच विद्यार्थ्यांची नावे नमूद करावी लागतील.

अभ्यासेतर कार्यक्रमाप्रमाणेच अभ्यासातहि मुलामुलींना चांगले मार्गदर्शन मिळते. महाविद्यालयाच्या वेळाखेरीजहि प्राध्यापक जादा तास घेतात. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी सोडवितात. एकमेकाबद्दलच्या आपुलकी मुळे निर्माण झालेला जिव्हाळा सर्वांच्याच मनात उत्साह निर्माण करतो. आमच्या कॉलेजच्या समृद्ध वाचनालयाचा व रीडिंग-रूमचा सर्वांनाच लाभ होतो.

या वर्षी स्नेहसंमेलनाच प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कविवर्य पद्मश्री ग. दि. माडगूळकर लाभले होते. संमेलनात त्यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले. त्यांच्या सानिध्यात यंदाचे स्नेहसंमेलन थाटामाटात पार पडले. प्रसिद्ध साहित्यिक व नामवंत विचारवंत श्री. हमीद दलवाई यांचे आमच्याकडे झालेले व्याख्यान ही आमच्या विद्यार्थ्यांना एक वैचारिक पर्वणी होती. व्याख्यानानंतरच्या प्रश्नोत्तराने वातावरण अत्यंत खेळीमेळीचे झाले.

**अंकासंबंधी थोडेसे :** या अंकाच्या दृश्य स्वरूपासाठी अनेकांचे हार्दिक सहाकार्य लाभलेले आहे. अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लेखनसहाय्य केले म्हणून तर हा अंक उभा राहिला. आमच्या अंकातल्या कविता-विभागाकडे आम्ही मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो. आमचे एक गुणी विद्यार्थीमित्र मारुती भोसले यांचा तर आवर्जून उल्लेख केला पाहिजे. कवि-प्रवृत्ति असलेल्या या माणसाच्या हातात

**कॉलेजचो शान वाढविणारा राजा खोत :** यंदाच्या शैक्षणिक वर्षात राजा खोत याने महाविद्यालयाला नेत्रदीपक यश मिळवून दिले. आंतरविद्यापीठीय सामन्यापर्यंत त्याने दौड मारली होती. धावण्याच्या शर्यतीतील विद्यापीठातील कित्येक उच्चांक त्याने मोडले. आमच्या महाविद्यालयाचे नाव शिवाजी विद्यापीठाच्या क्षेत्रात सर्वतोमुखी होण्यास राजा कारणीभूत झाला. त्याच्या यशाचा आम्हा सर्वांस अभिमान वाटतो. मैदानी खेळात आमची मुले आंतरविभागीय सामन्यापर्यंत पोहोचली होती. आर. बी. पाटील व एम्. एन. म्हाडी यांनीहि धावण्याच्या शर्यतीत नंबर पटकाविले आहेत. त्याचप्रमाणे रजपूत, आर. एम्. देसाई, बी. एस्. मोहिते, एस्. एम्. पाटील, मगदूम आणि बापू फडणीस हेहि विभागीय स्पर्धांमध्ये चमकले. फुटबॉल व कबड्डी यांचे संघ विभागीय स्पर्धांसाठी पाठविण्यात आले होते.

**विविधांगी विकास :** महाविद्यालयामध्ये अनेक क्षेत्रात हिरीरीने भाग घेणारी, कर्तृत्व दाखविणारी मुले व मुली आहेत. चित्रकार व कवी म्हणून सर्वांस परिचित असलेला मारुती भोसले, कवयित्री कुंदा पेडणेकर, नकलाकार कोठीवाले अभिनयामध्ये गुण दाखविणारी खेबूडकर भावंडे, महाविद्यालयाच्या सर्व कार्यक्रमात अग्रभागी असणारे राम जोशी, बापू फडणीस, हरिभाऊ चव्हाण, सुभाष आजरी, मुळकुडे, राजा शित्रे ही काही नावे ताबडतोब स्मरणात येतात. सहज आठवली म्हणून वरील नावांचा उल्लेख केला. एरव्ही सर्वच विद्यार्थ्यांची नावे नमूद करावी लागतील.

अभ्यासेतर कार्यक्रमाप्रमाणेच अभ्यासातहि मुलामुलींना चांगले मार्गदर्शन मिळते. महाविद्यालयाच्या वेळाखेरीजहि प्राध्यापक जादा तास घेतात. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी सोडवितात. एकमेकाबद्दलच्या आपुलकी मुळे निर्माण झालेला जिव्हाळा सर्वांच्याच मनात उत्साह निर्माण करतो. आमच्या कॉलेजच्या समृद्ध वाचनालयाचा व रीडिंग-रुमचा सर्वांनाच लाभ होतो.

या वर्षी स्नेहसंमेलनाच प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कविवर्य पद्मश्री ग. दि. माडगूळकर लाभले होते. संमेलनात त्यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले. त्यांच्या सानिध्यात यंदाचे स्नेहसंमेलन थाटामाटात पार पडले. प्रसिद्ध साहित्यिक व नामवंत विचारवंत श्री. हमीद दलवाई यांचे आमच्याकडे झालेले व्याख्यान ही आमच्या विद्यार्थ्यांना एक वैचारिक पर्वणी होती. व्याख्यानानंतरच्या प्रश्नोत्तराने वातावरण अत्यंत खेळीमेळीचे झाले.

**अंकासंबंधी थोडेसे :** या अंकाच्या दृश्य स्वरुपासाठी अनेकांचे हार्दिक सहाकार्य लाभलेले आहे. अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लेखनसहाय्य केले म्हणून तर हा अंक उभा राहिला. आमच्या अंकातल्या कविता-विभागाकडे आम्ही मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो. आमचे एक गुणी विद्यार्थीमित्र मारुती भोसले यांचा तर आवर्जून उल्लेख केला पाहिजे. कवि-प्रवृत्ति असलेल्या या माणसाच्या हातात

परमेश्वराने कुंचलाहि देऊन ठेवला आहे. आमच्या या अंकावरचे मुख-पृष्ठ त्यांच्याच कुंचल्याने साकार झालेले आहे. आमच्या संपादक मंडळाचे मला मोलाचे सहकार्य मिळालेले आहे हे मला मुद्दाम नमूद केले पाहिजे. विशेषत: प्रा. मनियार व प्रा. ठाणे यांच्या सहकार्यामुळेच हे काम पूर्ण होऊ शकले आहे. किंबहुना सर्वच प्राध्यापकांचे मार्गदर्शन मला उपयुक्त झालेले आहे. विद्यार्थी-प्रतिनिधी श्री. वीरेंद्र पाटील यांच्या उत्साहामुळे तर मी सतत ताजातवाना होऊ शकलो. महाराष्ट्रातल्या विविध मासिकातून प्रकाशित होणाऱ्या प्रा. गुरव यांच्या कविता आमच्या विद्यार्थी-मित्रांना प्रेरणा ठरतात. प्रा. गुरवांचे या अंकासाठी झालेले सहाय्य मी कधीहि विसरणे शक्य नाही. मासिकाच्या जुळवणीपासूनच आमच्या कार्यालयाचे प्रमुख श्री. सबनीस व त्यांचे सर्व सहकारी यांनी आम्हांस तत्परतेने मदत केलेली आहे. या सर्वांचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो. एम्. आर. हायस्कूलच्या परिसरातच आम्ही वावरत असतो. त्यांचे नेहमीचेच सहकार्य आहे. मुख्याध्यापक श्री. आसगावकर आणि त्यांचे सहकारी यांचे आभार.

शेवटी, जिथल्या मातीमध्ये शिक्षणाचे हे रोप वाढते आहे, समृद्ध होते आहे, त्या गडहिंग्लज नगरीचे आभार मानलेच पाहिजेत.

या अंकात जे जे चांगले आहे ते वरील सर्वांचे आहे. दोषांचा धनी मी. यापेक्षा आणखी काय सांगणार ? सर्वासर्वांचे पुन्हा एकदा आभार मानून मी इथेच थांबतो.

**– मधु कुळकर्णी**

# अनुक्रम :


## मराठी विभाग :

**सोळा कविता** : मारुती भोसले, यशवंत बांदेकर, एच्. बी. देसाई, सूर्यकांत घुगरे, डी. ए. मुल्ला, दिलीप कुलकर्णी, मंगला पेडणेकर, कृष्णा खामकर, कुंदा पेडणेकर, शेखर हत्ती, मो. शा. कुलकर्णी, सुरेंद्र साळवी, शोभा फडणीस, शिवराज रेडेकर माळी एस्. पी.

**तीन कथा** : यशवंत बांदेकर, कुलकर्णी बी. आर., बाळ जोशी

**एक एकांकिका** : कृष्णा खामकर

**एक ललित लेख** : कु. कला तोरगल्ली

**पाच लेख** : कु. कुंदा पेडणेकर, सुभाष धुमे, शेखर हत्ती, एस्. बी. आजरी, हरिभाऊ चव्हाण.

**दोन परीक्षणे** : कु. मंगला पेडणेकर, कु. शोभा फडणीस.

**एक संकलन** : अलका मनोहर पत्की

## हिन्दी विभाग :

**नौ कविताएँ** : जी. आर. मुल्ला, बी. व्ही. झोंड, एस्. के. फडणीस, गोविंद दादू पाटील, डी. ए. मुल्ला, व्ही. आर. बेनके, सुर्यकांत घुगरे.

**एक कहानी** : झोंड ए. एम्.

**चार वैचारिक लेख** : एस्. के. सुळकुडे, ए. बी. जाधव, गोविंद दादू पाटील, एस्. बी. केसरकर.

**तीन साहित्यिकोंका परिचय** : आर. एच्. वारुसे, सूर्यकांत घुगरे.

## ENGLISH SECTION :

*Poem* : Shivaji Redekar

*Autobiography* : Veerkumar Kothiwale

*Notes & Topics* : Shankar B. Jadhav, Shekhar Hatti, Laxmikant Injalkar, Shivaputra Arabole.



माझा मऱ्हाटाचि बोल कौतुके ।
परी अमृतातेहि पैजा जिंके
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥

# मराठी विभाग

## रंग आकाशी झरता



रंग आकाशी झरता
साद सांजेचे हे येती
तुझ्या वाटेवर असे.
डोळे लावावे मी किती

चाले अंधाराची वाट
नील काजव्यांचा थवा
तुझ्या शब्दांचा तो गंध
वाटे चांदण्यांनी प्यावा

रात्र चांदणी सोसते
मध्यान्हीच्या नील व्यथा
चंद्र झाडीत उजळे
कुठे डोंगरांचा माथा

साद घाल ना तू आता
रात चांदणी थांबली
वाट पहायची किती
निज डोळ्यांतून न्हाली.

कविता

**मारुती भोसले**
द्वि. व. साहित्य

## बंगला

रोज बांधतोय बंगला
पण दुसऱ्याच दिवशी असतोय भंगलेला
जागा आहे तीच
कलाकारही मीच
मग असं का घडतंय्
---कळत नाही ---कळेलसं वाटत नाही ---
बांधण्यासाठी जेव्हा जागाच बदलतो
तेव्हा उगा असलेलं मन म्हणतं :
अरे हा पत्त्यांचा बंगला
कधी पाहिला आहेस का कुणी उभारलेला --- !



**यशवंत बांदेकर**
तृ. व. साहित्य

## तू नसताना

तू नसताना
तुझी कल्पना
मनात माझ्या
तू नसताना
मूर्त तुझी ती
नयनी माझ्या
तू नसताना
होते खळबळ
हृदयी माझ्या
तू नसताना
धुंद होत मी
विसरुन सारे
तू नसताना
विसावतो मी
आठवणीतच . . .
पळभर . . . क्षणभर

**सूर्यकांत घुगरे**
पदवीपूर्व साहित्य

## दीपक

स्वतः जळता जळता
घेतो अंधाराला पोटी
जगी प्रकाश देण्याची
दीपकाला हौस मोठी!

**एच्. बी. देसाई**
द्वि. व साहित्य

## फसवणूक



कित्येक वेळा सांगितले होतेस
तुझ्याशीच विवाह करीन
आणि म्हणाली होतीस
आयुष्यभर प्रीतीचे नर्तन करीन
पण..... तू कितपत खरे केलेस?
वचनभंगच केलास . . .
नोकरीसाठी गेलो असता दूर
लग्नगाठ बांधून घेतलीस---
तुला असे फसवायचेच होते
तर. . तर का प्रेमाचे नाटक केलेस ?
गोड गोड स्वप्ने का रंगविलीस
इतकी निष्ठूर असशील
असे मला कधीही वाटले नव्हते.
मातीमोल केलेस माझे जिणे
असे पुन्हा कुणाचे करशील?
विसराव्या म्हणतो सगळ्या स्मृती
पण विसरु शकत नाही
कारण तुलाच ते शक्य झाले
मला कदापीही होणार नाही . . . !

**डी. ए. मुल्ला**
प्र. व साहित्य

## अज्ञात

अलगद आले ऊन जसे की थवे पांखरांचे
बघता बघता तुडुंब झाले इथे तिथे साचे. .
क्षितिज वेढले गाव पेटुनी सुने सुने झाले
डोईवरती मुकुनी आली काळी मेघ-फुले. .
पाठशिवणी मुरु जाहली तिकडे माळावरी.
स्वार होऊनी ऊन बसतसे मधल्या वाटेवरी
तोंड लपवुनी भिउनी पळाले वारे वेगात
बोटे वरुनी फिरवीत आहे कोणी अज्ञात .

**दिलीप कुलकर्णी**
द्वि. व. साहित्य

## ज्वाळा

कितिकांच्या किती यातना झेलणार . . .
बघ ह्या यातनांच्या किती किती ज्वाळा
ज्वाळाच ज्वाळा . . ,
ज्वाळांनी करपणार आहेत
तुझ्या गंध-भावना
ज्वाळाच झेलण्यास
तुला जन्मावे लागणार आहे पुन्हा पुन्हा . !

**कु. मंगला पेडणेकर**
प्र. व. साहित्य

## बंगला

रोज बांधतोय बंगला
पण दुसऱ्याच दिवशी असतोय भंगलेला
जागा आहे तीच
कलाकारही मीच
मग असं का घडतंय्
---कळत नाही ---कळेलसं वाटत नाही ---
बांधण्यासाठी जेव्हा जागाच बदलतो
तेव्हा उगा असलेलं मन म्हणतं :
अरे हा पत्त्यांचा बंगला
कधी पाहिला आहेस का कुणी उभारलेला --- !



**यशवंत बांदेकर**
तृ. व. साहित्य

## तू नसताना

तू नसताना
तुझी कल्पना
मनात माझ्या
    तू नसताना
    मूर्त तुझी ती
    नयनी माझ्या
तू नसताना
होते खळबळ
हृदयी माझ्या
    तू नसताना
    धुंद होत मी
    विसरुन सारे
तू नसताना
विसावतो मी
आठवणीतच . . .
  पळभर . . . क्षणभर

**सूर्यकांत घुगरे**
पदवीपूर्व साहित्य

## दीपक

स्वतः जळता जळता
घेतो अंधाराला पोटी
जगी प्रकाश देण्याची
दीपकाला हौस मोठी

**एच्. बी. देसाई**
द्वि. व. साहित्य

## फसवणूक



कित्येक वेळा सांगितले होतेस
तुझ्याशीच विवाह करीन
आणि म्हणाली होतीस
आयुष्यभर प्रीतीचे नर्तन करीन
पण..... तू कितपत खरे केलेस?
वचनभंगच केलास . . .
नोकरीसाठी गेलो असता दूर
लग्नगाठ बांधून घेतलीस---
तुला असे फसवायचेच होते
तर. . तर का प्रेमाचे नाटक केलेस ?
गोड गोड स्वप्ने का रंगविलेस
इतकी निष्ठूर असशील
असे मला कधीही वाटले नव्हते.
मातीमोल केलेस माझे जिणे
असे पुन्हा कुणाचे करशील?
विसराव्या म्हणतो सगळ्या स्मृती
पण विसरु शकत नाही
कारण तुलाच ते शक्य झाले
मला कदापीही होणार नाही . . . !

**डी. ए. मुल्ला**
प्र. व. साहित्य

## अज्ञात

अलगद आले ऊन जसे की थवे पांखरांचे
बघता बघता तुडुंब झाले इथे तिथे साचे. .
क्षितिज वेढले गाव पेटुनी सुने सुने झाले
डोईवरती मुकुनी आली काळी मेघ-फुले. .
पाठशिवणी सुरु जाहली तिकडे माळावरी.
स्वार होऊनी ऊन बसतसे मधल्या वाटेवरी
तोंड लपवुनी भिउनी पळाले वारे वेगात
बोटे वरुनी फिरवीत आहे कोणी अज्ञात. ,

**दिलीप कुलकर्णी**
द्वि. व. साहित्य

## ज्वाळा

कितिकांच्या किती यातना झेलणार . . .
बघ ह्या यातनांच्या किती किती ज्वाळा
ज्वाळाच ज्वाळा . . ,
ज्वाळांनी करपणार आहेत
तुझ्या गंध-भावना
ज्वाळाच झेलण्यास
तुला जन्मावे लागणार आहे पुन्हा पुन्हा . !

**कु. मंगला पेडणेकर**
प्र. व. साहित्य

## एक लोकगीत



पंडरपूर गाव माजं म्हायार आनंदाचं
चंद्रभागमंदी हाय देवूळ नारदाचं
पंडरपूर गाव माजं हाय देशामंदी
पुंडलिक ह्योग देव चंद्रभागच्या तासामंदी
पंडरीला जातो रनखांबाला ठवयनी
मन माजं हे झालं दंगू सख्या हारीला भेटुनी
पंडरपूरामंदी मी ग बसलो बारीला
माज्या दर्शनाची काळजी पडली हारीला
पंडरपुरामंदी मी ग येचिते चाराचुरा
इट्टल न्हाइ घरा रकुमाईचं पाय धरा
भरली चंद्रभागा मी ग पल्याड कशी जाऊ
जेवत्या इट्टलाने तीन फुलांची केली नावू
त्यात बसली भैणभाऊ नाव चालवी किसन देव

**संग्राहक:**
**कृष्णा खामकर**
पदवीपूर्व साहित्य

## टिळा

कर्धाकाळी मी बांधलेल्या
माझ्याच समाधीवरची
पंचप्राणांच्या गंधाने दरवळणारी शुभ्र फुले
आज मीच उधळलीयत्
तुम्हाला न दिसणाऱ्या माझ्या हातांतून
. . . शब्दाशब्दांतून
फुलांना गंध लाभला होता
तोही झिजणाऱ्या चंदनातून
कुणास ठाऊक जाताना घेऊन गेले होते कुणाकुणाचे ऋण
आज कशी एकाएकीच चाहूल
चंदनाभोवतीच काळाकुट्ट सर्पाच्या
. . . विषारी ज्वाळाच ज्वाळा
म्हणूनच अज्ञातातून आलेय्
लावण्यासाठी माझ्या शीतळ रक्ताचा टिळा . . . !

**कु. कुंदा पेडणेकर**
तृ. व. साहित्य.

## कहाणी

आठवणीची रेशीमजाळी
आपोआपच विणली जाते
हळूच ओढता पदर कुठला
वीण त्याची उसवत जाते...
शोध–शोधले तरी
त्याचे दुसरे टोक गवसत नाही
'चिमण्या' येती...दाणे नेती...
परी कहाणी संपत नाही...!

**– शेखर हस्ती**
द्वि. व. वाणिज्य

( 'विशाल महाराष्ट्र' तर्फे
दिवाळी अंकासाठी आयोजिलेल्या
महाविद्यालयीन गटातील काव्यस्पर्धेतील
दुसरे पारितोषिक मिळालेली कविता )

## चोरटी



रात्रीच्या गर्भातून ओघळलेलं
टपोरं चांदणं चोरुन नेताना
कुणा ललनेचं पाऊल घसरलं
अन्........ डचमळला डोईवरचा कुंभ
उठले तरंग लाख लाख
ओसंडली अंधाराची धार
भिजली सारी धरती
ओलावले अंधुक प्रकाशाचे सूर
तरीही चालते आहे गुजपावलांनी
उरी घेऊन चांदणं टपूर
रातकिडयांची किरकिर कुठंतरी दूर. दूर...

**मारुती भोसले**
द्वि. व. साहित्य

## प्रतिभा

लेऊन हार फुलांचे
ओठांत ही शब्द-सृष्टी
ताटव्यात भावनांच्या
आली नवीन दृष्टी
  ही आनंदयात्री येते
  वेदनांत संगतीला
  अन् फुलवून जाते
  व्यथांच्या त्या मोगरीला

**मो. शा. कुलकर्णी**
तृ. व. साहित्य

## दान

सहज एकदा
गॅलरीतल्या नाजुक देहलतेवर
माझा एक नेत्रकटाक्ष
तिची सलज्ज खाली मान
प्रीतीचे पहिले पान
स्वप्नातच
तिचे मला हृदयाचे दान , . . !

**सुरेंद्र साळवी**
पदवीपूर्व वाणिज्य

## खेळ



कित्ती जन्मांचं दुर्दैव जपलं होतं कोण जाणे . . .
म्हणूनच स्वतःला नियतीच्या हाती हरवून बसलेय्
माझ्याशी गुंफलेले तुझ्या मायेचे पदर
काळ आपल्या काळ्या हातांनी
केव्हा घेऊन गेलाय् . . . कळलेही नाही . . .
हा एक काळाचा खेळ,
तुझ्या मायेच्या पोटीच
वाटतं तुझ्या मागून यावं
अन् . . . तू ...... मी एक व्हावं
पण हाही काळाचाच खेळ
कधी काळी खेळला गेला तर . . . !

**कु. शोभा फडणीस**
प्र. ब. साहित्य

## प्रीतिसंगम

प्रीतीच्या अंगणी, तुझे नर्तन विलोल
शब्दाविना मूक बोल त्यांत सुख अनमोल
बांध प्रीतीची नूपुरें टाक हळू पदावली
प्रीतीची पडू दे तुझ्या हृदयी साउली
थंड वाऱ्यांत या सहवास रविराजाचा
तसा तुझ्या प्रीतीत सुगंध अत्तरफायाचा
ठेव जपून प्र ति तुझ्या मन सागरांत
उठे तरंग त्याचिया माझ्या हृदयाकाशांत
नको माणीक,नको पाचू,सुवर्णाचे नको मणी
तुझ्या मंगल प्रीतीची घाल मला ओवाळणी

**शिवराज रेडेकर**
प्र. ब. वाणिज्य

## मराठी माणूस

मराठमोळा माणस तू रे
शिवरायाचे वंशज सारे ।धृ॥
अहिंसेचे इथेच प्रस्थान
राजकारणी तुझाच मान
दाहि दिशांना तुझीच शान ।१॥
भारतियांच्या विमोचनाला
बलिदानास्तव धावुनि गेला
पाहुन तुज, अरि कंपित झाला ॥२॥
कोण कुणाचे दास न येथे
न्याय मिळतसे गरिबां जथे
लोकशाही करि वासहि येथे ॥३॥

**माळी एम्. पी.**
द्वि. ब. साहित्य

# नामदेवांचा नामवेद

□ कु. कुन्दा पेडणेकर

तृ. व. साहित्य

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या भूमीत नामदेवाने नामभक्तीचे इवलेसे रोप लावले आणि त्याचा वेल उत्तरेकडे जाण्यासाठी त्यांनी आपले जीवन-सत्व खर्ची घातले. ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रात ब्रह्मविद्येचा सुकाळ केला तर नामदेवामुळे 'हरिनामाचा सुकाळ' झाला. एवढेच काय पण, 'पंजाबातील नामदेव' चित्रित करताना शं. पु. जोशी म्हणतात त्याप्रमाणे महाराष्ट्रा--बाहेर जाऊन भागवतधर्मीय भक्तिमार्ग, पंढरपूरचा वारकरी-पंथ आणि श्री विठ्ठल हे दैवत यांची माहिती उत्तरेकडील लोकांना देणारे संत नामदेव हे पहिलेच संत होत.'

ज्ञानी भक्ताच्या भूमिकेवरुन नामदेवांनी लोकांना जो नवविधा भक्तीचा उपदेश केला त्यापैकी नाम--संकीर्तन-भक्ति ही तर त्यांच्या जीवनाची अविभाज्य घटक झाली होती. 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणम् पादसेवनम् । अर्चनं वदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम्' अशी ही नवविधा भक्ती असली तरी नामदेवांच्या अभंगचरणांतून प्रामुख्याने नाममंत्र प्रवाहीत झाल्याचे दिसून येते. नामदेवामुळेच महाराष्ट्रातील वारकरी संप्र-दायाला नाम--भक्तीच्या तत्वप्रणालीची बैसका लाभली. 'अमृताहून गोड' अशी नामाची गोडी चाखली नाम-देवांनीच. विठ्ठलाचे रुप, गुण, नाम ---- विठ्ठलाची पंढरी यांच्याविषयी बोलू लागता नामदेवांच्या भाव-गंगेला भरती येते आणि मग भक्तीने भारलेले नामदेव भवव्यथेने गांजलेल्या भक्तांना पावन करुन जातात. नामदेव आणि भक्ति यांचे अद्वैत फुल-गंध सारखे आहे. या नाम-भक्तीचा रस वाहतो तो त्यांच्या अभंग-वेलीतून की जिच्या शितळ छायेत विठ्ठलभक्त विसाव्याला येतात. सर्वसुलभ अशा नामसंकीर्तन-भक्तीमध्ये 'जाति व्यक्तीस विटुले' पडते या अनुभूतीतूनच--

काळ नसे नामसंकीर्तना । उंच नीच योनी हे ही नसे
धरा नाम कंठी सदासर्वकाळ । मग तो गोपाळ संभाळील॥
नामा म्हणे फार सोपे हे साधन । वाचे नाम घेणे इतुकेचि॥

हे नामदेवांचे समर्थ उद्गार आले आहेत.

नामदेवांचे व्यक्तिगत जीवन तसे मन दुभंगून टाकणारेच होते. कष्टप्रद जीवनातून आनंदमार्ग शोध--ण्यासाठी नामदेव विठ्ठलचरणातून वाहणाऱ्या नाम---भाव--गंगेकडे वळले. तिथेच त्यांना आत्मिक आनंद लाभला. 'नामदेव म्हणे परब्रह्म ते नाम.' याखेरीज दुसऱ्या आचारधर्मांचे इथे आडंबर नाही. हरिभक्तीविण या जिण्याला काही अर्थ नाही. म्हणूनच 'भक्तिविणे जिणे जळो लाजिरवाणे। संसार भोगणे दुःखरुप। तसेच 'नामापाशी असे भक्तिमुक्ती' ही त्यांची आत्म---विश्वासाची ---- अनुभवाची खूण आहे.

ईश्वर हा निराकारच पण जेव्हा त्याने रूप धारण केले तेव्हाच त्याला नामही प्राप्त झाले. म्हणून नाम--रूपात भिन्नता नाही आणि म्हणून नामदेव आवर्जून सांगतात, "नाम तेचि रूप, रूप तेचि नाम। नामरूपा भिन्न नाही नाही ॥ आकारला देव नामरुपा आला। म्हणोनि स्थापिला नामवेद।"

नामदेवाचे सारे अभंग भक्तीनेच पोसले आहेत. कायावाचामनेकरून हरीला शरण जाणे, पंचेंद्रियांची पुष्पाञ्जली प्रभुचरणी अर्पिणे हा त्यांचा भक्तिमार्ग होता. 'आरती' होऊन वाणीने केवळ हरीचे नाम उच्चारताच जीव उद्धरुन जातो. हे नामातील उद्धरणसामर्थ्य नामदेवाने आपल्याच जीवनाने सिद्ध करुन दाखविले. त्यांच्या अभंग वाङ्मयाला 'स्वानुभूतवासाचे दान' लाभलेले आहे. नाम-देवाने नामाला वेदांचे महत्त्व प्राप्त करुन दिले. किंबहुना त्यांनी 'नाम-वेदा'चीच निर्मिती केली म्हणा ना. ह्या नामवेदाने सर्वांसाठी मोक्षमार्गाची द्वारे खुली ठेवली आहेत. नामदेवांच्या पूर्वी नामभक्तीची पाऊलवाट होती पण त्याला राजपथाचे स्वरुप दिले ते नामदेवानीच. 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप' विवेचिणाऱ्या ह. श्री. शेणोलीकरांच्या शब्दात सांगायचे तर --- 'नाम

हाच देव ' हा सिध्दान्त मांडून ज्यांनी अभंगात्मक नामवेद लिहिला ते नामदेव महाराष्ट्रातील भक्तिमार्गाचे प्रवर्तक नि यशस्वी प्रसारक होत. "

संसारी मुमुक्षू जनांना भक्तीची वाट सोईची. कोणत्याही 'मार्गाने गेलो तरी मोक्षधाम मिळणारच म्हणून ' गृहस्थाश्रमु न सांडिता कर्मरेखा नोलांडिता ' हरिचरण हवे असतील तर सुलभ उपाय म्हणजे नाम–जप – हरिभक्ती होय. या हरिनामामुळे जिव्हेला अमृताचे पाझर फुटतात. ' अमृताहून गोड ' असलेल्या या नामाची महती गाताना नामदेव म्हणतात -----

सर्वांमाजी सार नाम हे देवाचे । सर्व साधनांचे सार जे का व्रत,तप,दान हवन पूजन। न लगे साधन नाम म्हणता।

ईश्वर लपलेला आहे. अव्यक्त आहे. पण नाम लपलेले नाही. अव्यक्त नाही. तेव्हा ते कुणीही घ्यायला हरकत नाही. ईश्वराच्या भक्तीत तल्लीन झाल्यामुळे नामदेवांचे अष्टसात्त्विक भाव जागृत होत व नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागत. कर्माची कटकट परती सारून विठ्ठलाची भक्ती हेच साधन व साध्य मानले. साधन-साध्याची एकरूपता या भक्तियोगात आहे. हेच तर भागवतधर्मातील भक्तिमार्गाचे वैशिष्टच.

देह जावो अथवा राहो
पांडुरंगी माझा भावो

असे नामदेवाने उच्चारताच त्यांच्या अत्युत्कट भक्तीची परमावधी कळते. ' बाहेरी भीतरी कैवल्य ' च असे ' मुखाचे साजिरे ' जे ' श्रीमुख ' त्यावरून आपल्या जीव-भावाचे निंबलोण नामदेवांनी उतरवून टाकून, जिथे ' परेसीही पडे मिठी ' असा ब्रह्मानंद अनुभवला.

भक्तीमध्ये द्वैत–अद्वैताचे वादवलय संभवतच नाही. भक्तीत द्वैतही आहे व अद्वैतही आहे.

शिवस्याभ्यन्तरे शक्तिः शक्तेरभ्यन्तरे शिवः
अन्तरं नैव जानीयात् चन्द्रचन्द्रिकयोरिव ।

असे काहीसे या भक्त–भगवंताचे नाते आहे. भक्तियोगातील द्वैतात अद्वैत व अद्वैतात द्वैत अनुभवता येत असल्यानेच या भक्तराजांना निव्वळ अद्वैताची गरज भासली नाही. उलट,

मी चकोर तू चंद्रमा ।
मी सरिता तू सागर ।
मी चातक तू मेघ ।

असे द्वैतच ते अनुभवू इच्छितात की ज्यामध्ये भक्तीचे महरामृत आंकंठ पिता येते. असे हे द्वैताचे नाते सांगणारे हरिभक्त हरिचरणाचे अनुसंधान सुटले तर ' जीवनाविगळी मासोळी ' तसे तळमळतात; हरिरूप नाही पाहिले तर त्यांचे डोळे उन्मळून पडतात, मुखात हरिनामस्मरणाचा खंड पडला तर जिव्हा खंडीत होते. सावळ्या विठाईचे नाम हेच ज्यांच्या जीवनाचा मंत्र आहे ते नामदेव ' नलगे तुझी भक्ति नलगे तुझी मुक्ति । ' म्हणतात. कारण नाम घेताक्षणीच दोन्हीही आपोआप लाभतात. नामदेवांची ही चातुर्यकळा अनुभवास येते. अर्थात हे नामस्मरण म्हणजे सोऽहं चा उच्चार याचे विस्मरण होऊ देऊ नये.

नामा म्हणे मना होई रामरुप
अखंडित जप सोहं सोहं

अशा या परमसुख देणाऱ्या नामाचे महत्व ज्ञानगर्वी ब्राह्मणांनाही नामदेवाना सांगणे भाग पडले ते असे

ब्राह्मणा न कळे आपुले ते वर्म
गवसे परब्रह्म नामे एका ।

' नामा ऐसे सोपे नाही त्रिभुवनी ' असे नाम - प्रेम नामदेवांचे आहे. 'नामेवीण पाही आम्हापाशी काही नाही' असे ते स्वतः सांगतात. सर्वसमर्पणशील भक्तीने जीवन नामदेव जगत होते- नामदेवांच्य नामभक्तीतील प्रेमामृत सामान्यजनांना कळणार नाही ते फक्त विठ्ठल जाणू शकतो. ते स्वतःच म्हणतात ----

नामयाचे प्रेम केशवचि जाणे
केशवासी राहणे नाम्यापाशी
केशव तोच नामा, नामा तोचि केशव
प्रेमभक्तिभाव मागतसे ।।

हरिनाम हे ' तीर्थांचे तीर्थ असून आगमी--निगमी अर्थीपदी सर्वत्र एक नामच आहे. ' अनुभवे भावे कष्टे प्रपंचे ' कसेही असो, पण नाम घ्यावे, नाम घ्यावे केशवाचे ; ' ज्यांच्या मुखी हरिनाम आहे अशा भाग्यवंताचे अवघे कुळच पुण्यरूप म्हटले पाहिजे. याप्रमाणे नामदेवांनी येथून--तेथून नाममहिमाच गायिला आहे. तो विठ्ठल लपलेला असला तरी त्याला आपले नाम लपवता येत नाही. म्हणूनच तर

लपलासि तरी नाम कोठे नेसी
आम्ही अहर्निशी नाम गाऊ ।।

असा मार्मिक प्रश्न नामदेवांनी देवास केला आहे. ज्या ' सामान्य परिवारूंना ' वेदपठण, शास्त्रबोध, ब्रह्मज्ञान, अनुष्ठान, विधीपूर्वक कर्मधर्म यापैकी काही करता येणे शक्य नाही, त्यांना ' नामाचे प्रबंध पाठ

करा ' असा आदेश नामदेवांनी दिला आहे. कारण ' नाम हेचि कर्म नाम हेचि ब्रह्म. ' त्यामुळेच तर 'नामे भक्ति जोडे, नामे कीर्ति जोडे । नामे सदा चढे मोक्ष होता. ' पण प्रेमाचा जिव्हाळा हा भक्तीचा गाभा आहे हे मात्र या भक्तांनी विसरू नये. हे सर्व विवेचन पाहिले म्हणजे नामदेवाने नामभक्तीचे कोडकौतुक माहेर-वासिनी सारखे केल्यासारखे वाटू लागते.

' नामा म्हणे नाम ॐकाराचे मूळ । ब्रह्म ते केवळ विटेवरी ' म्हणूनच नामदेव या नाम–विटेवर आपल्या आर्तभक्तीचे पान अर्पण करतात. नामदेवाच्या या इवल्याशा भावतुळशीच्या पानाने खाली आलेले नामदेवांचे पारडे वर नेण्यास स्वतः भगवंतही असमर्थ आहे.

नाम हाच देव मानणारे नामदेव मुखी विठ्ठलाचे नाम घेऊन, डोळ्यात विठ्ठलाचे रुप साठवून कीर्तनात नाचू लागले की ते भक्ताचा भगवंत केव्हा होतात हे समजतही नाही. या कीर्तनात ' भावाचा भुकेला अन-हेतवा देवाबद्दल उरी जपलेल्या नामदेवांच्या वात्सल्य-गर्भातून आर्त शद्बांचे धुमारे बाहेर प्रकटू लागतात. नामदेवांच्या या आर्तभक्तीमुळेच ज्ञानेशांनी त्यास नामा तू प्रेमाचा पुतळा - - - भक्तीचा जिव्हाळा - - - मैत्र-येचे' चिरकळा . . असे गौरवाने संबोधले आहे. तर मोरोपंतानीही ' याणे प्रसिद्ध केले विठ्ठल हे नाव ' असे प्रशस्तिपत्र दिले.

नामाच्या या नित्य आनंदाच्या ओंजळीत असंख्य भक्तांच्या भावकळ्या फुलून येतात. म्हणूनच शेवटी मी एवढेच म्हणेन की, नाम-विटेवर उभ्या असलेल्या विठ्ठलाच्या सावळ्या चरणास नामदेवाने अर्पिलेल्या या भाव तुळशीच्या पानाला ' घालीन लोटांगण ! '

□ □ □



नामदेव कीर्तन करिती । पुढे नाचे पांडुरंग

# गुलाबी

□ यशवंत बांदेकर
तृ. व. साहित्य

उद्या वर्षाचा पाडवा , या जाणिवेने गुलाबीला रात्रभर चैन पडली नाही. या कुशीवरून त्या कुशीवर ती सारखी तळमळत होती. शेजारीच चार वर्षाचा चिम्या झोपेत मिस्कीलपणे हसत होता. रोजच्या पेक्षा आज गुलाबी लवकरच उठली. तीन दगडांनी तयार केलेल्या चुलीवर चार तांबे पाणी तापत ठेऊन तिने चुलीत, काल गोळा करुन आणलेल्या काटक्याकुटक्या घातल्या.त्याप्रकाशाने गुलाबीच्या झोपडीचा कानाकोपरा प्रकाशोत झाला. त्या उजेडातच गुलाबीने चार दिवसापूर्वी चार वावाच्या तीन तुकड्यानी तयार केलेल्या तिरंगी ठेवणीचे पातळ आणि एक चोळी गांठोड्यातून बाहेर काढली.

येव्हाना पाणी नाचू लागले होते. अधूनमधून दात नसलेल्या एका तेलकट फणीने तिने आपले केस टराटरा विंचरुन मानेवर मोठासा आंबाडा बांधला. हे करीत असताना कपाळाच्या दोन्ही बाजूना दोन कोंबडे पाडायला ती विसरली नाही.

झुंजूमुंजू होत आलं होतं. लगबगीने चार तांबे पाणी अंगावर घेऊन तिने त्या तीन रंगी पातळाचा–साजशृंगार केला. आंबांड्यात, सुकलेल्या शेवंतीची माळ खोवली. कुंकवाचा टिळा लावण्यासाठी आरशाचा तुकडा घेऊन ती उभी राहिली.

आरशांत आपला चेहरा पाहून तिला उगाचच लाजल्यासारखे झाले. कपाळावर एक भला मोठा कुंकवाचा टिळा टेकून तिने आरशाचा तुकडा बाजूला केला.

काल गोळा करुन आणलेल्या भाकरीच्या चार पाच तुकड्यांना पाण्याबरोबर तिने पोटात ढकलले. वर घटाघटा पाणी पिऊन ती तयार झाली–

चिम्या अजून झोपला होता. त्याच्यासाठी तिने चार भाकरीचे तुकडे राखून ठेवले. झोपडीच्या छपराला टांगलेली जुनी चाळ घेतली आणि झोपडीचे कवाड लोटून घेतले.

बाहेर येऊन तिने आवाज दिला.

' भिरुदा ऽऽ ओ भिरुदा ! '

' काय ग गुलाबे. का जीव तोडतीयास. '

' आरं, किती वकुत झाला, दिसतुया न्हव का?'

' व्हय, पर हातच व्हतु की. '

'बरं, त्ये न्हाऊदे. झिप्या, इट्टी आनी लक्स्या कुट हैती?'

' त्येसनीबी बीगी याला सांगुनशान आलुया. '

' ब्येस केलस. '

थोडक्या अवधीत सर्वजण गोळा झाली. भिरुदा गळयात फाटका मफलर टाकून आणि जुनाट ढोलकी घेऊन सर्वांच्या पुढे होता. केसांना फार दिवस वंगण न मिळाल्याने डोक्यातील साखऱ्या पावडर स्पष्ट दिसत होती. त्याच्या कपड्यावरुन आणि चालीवरून त्या मंडळींचा तो म्होरक्या असावा असे वाटत होते. त्याच्या मागोमाग झिप्या ल्क्षी आणि इटी गुलुगुलु कुजबुजत चालली होती. सर्वांच्या मागे एकटीच गुलाबी होती.

आज गुलाबी कांही औरच दिसत होती दुरंगी पातळाची नेसणी अंगाबरोबर होती. त्यामुळे पायाच्या पिढऱ्यांची गोलाई डोळ्यात भरत होती. अंगातील चोळी तोटकी असल्याने तीही लगटूनच बसली होती. उरोभाग अधिकच भरदार दिसण्यात त्या चोळीचाच हात असावा. गुलाबीचा चेहरा तिच्या नावाला साजेसाच होता. उगवत्या नारायणाच्या गुलाबी किरणाने गुलाबीचा चेहरा अधिकच गुलाबी दिसत होता. पायातील रुमझुमणारी चाळ तिला साथ देत होती.

आज गुलाबी गांवभर नाचणार होती. आपल्या पायातील घुंगुरांच्या तालावर अनेकांच्या मनांना नाचवणार होती. अनेकांचे देहभान हरवणार होती. बऱ्याच लोकांचे खिसे रिकामे करणार होती.

तशी ती नाचगाण्यात तरबेज होती असेही नाही, पण तिच्या मोहक सौंदर्यावर आणि मादक हालचालींवर आजवर अनेकाना तिने पिसे केले होते. ती नेहमीच नाचगाणी करणारी होती असेही नाही, कुणबी लोकांच्या घरी जमा पोळ्याचा बेत असतो तसं. नाहीतर दिवस-

भर टोपली घेऊन गांवभर फिरून शिळापाका तुकडा जमा करावा आणि येतांना कांही जळणकाटूक मिळाले तर गोळा करावे, आणि यावरच आपला प्रपंच चालवावा हा तिचा दिनक्रम.

गुलाबीचा धनी तसा कांही उद्योग करीत नव्हताच. अंगापिंडाने धडधाकट असूनही खायला कार नी धरणीला भार या पलीकडे वेगळे असे अस्तीत्वच त्याला नव्हते. नाहीतर गुलाबीला हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या नसत्या.

गुलाबी आईबापांची एकुलती एक लेक. आपल्याला नाही करून त्यांनीं तिला थोड्या सुखानेच वाढविले होते. ती वयात येण्यापूर्वीच एक चांगला आणि जवळच्याच नात्यातील मुलगा बघुन तिचे हात पिवळे करून ते रिकामे झाले होते. मुलगा चांगला धड-धाकट होता. तो कामधंदा करील आणि मुलीला आपल्या प्रमाणे तुकडे गोळा करीत फिरावे लागणार नाही या त्यांच्या आशेवर मुलाने पाणी टाकले. लग्नानंतर कांही दिवस मजेत गेले. तो गांवात खडी फोडायला जात असे पण अलिकडे त्याचे लक्षण गुलाबीला कांही ठीक दिसेना तो वस्तीतील आडदांड लोकांच्या नादी लागला होता पुढे पुढे तर तो बऱ्याच उशीरा आणि दारुच्या नशेत झिंगतच घरी येऊ लागला. कामहि गेले. पैसा मिळेना पोट चालेना. व्यसन त्याला गप्प बसू देईना. अशा अवस्थेतच एक दिवस बऱ्याच उशीरा तो घरी आला गुलाबी वाटच पहात होती. तिला धन्याच्या नजरेकडे पहाणे होईना. आपल्याच तंद्रीत तो म्हणाला, ' गुलाबे मला पैसे दे. '

' कशाला ? '

' त्ये तुला घेऊनशान काय करायच ? '

' आव माज्या जवळ कुटला हाय पैका ? '

' मला ठाव हाय गुमान दे म्हंजे झालं '

' धनी, तुमची काय मी मस्करी करतोय व्हय? '

आता गुलाबी गुमान देत नाही असे पाहून त्याच्यातील राक्षस जागा झाला. त्याने तिच्यावर हात टाकला. गुलाबीने पुष्कळ प्रयत्न केले, पण व्यर्थ. त्याच्या हाताला तिच्या गळ्यातील सौभाग्य लक्षण लागले. आता गुलाबी चवताळली. सौभाग्य ठेवा हिस-डून घेण्यापूर्वीच गुलाबीच्या हालचालीने त्याच्या हातून सुटका करुन घेतली. त्याचा राग अनावर झाला. त्याने तिला बऱ्हिष्यास सुरवात केली. त्यावेळी गुलाबीला दिवस गेले होते. पोटात अंकूर वाढत होता. धन्याच्या राक्षसी मारापुढे तिचे चालेना. वेदना सहन होईनात. तिने हंबरडा फोडला.

गुलाबीचा हंबरडा ऐकून वस्तीतील लोक तिच्या झोपडीभोवती गोळा झाले. झाला प्रकार समजायला त्याना फार वेळ लागला नाही. त्यानी तिच्या घर-धन्याला बाहेर ओढून बडबड बडविले. पुन्हा असा प्रकार नजरेस पडला तर वस्तीतून हाकलून लावू अशी धमकी दिली. गुलाबी हुंदके देऊन रडत होती. तिला त्यांनी धीर दिला आणि ते आपापल्या झोपड्यातून निघून गेले.

त्या दिवसापासून गुलाबीचा धनी घरी विशेष असा नसतोच. लहर लागेल तेंव्हा येतो. असले कांही तर खातो. बसावेसे वाटले तर बसतो. नाहीपेक्षा झोपडी बाहेर कोठेतरी भटकत असतो. त्या घटनेपासून तरी वरील गोष्टीची पुनरावृत्ती झालेली वस्तीतल्या लोकांनी कधी पाहिली नाही. गुलाबीच्या आईबापांना ही हकी-कत कळली. त्यांनी मुलीच्या काळजीने हाय खाल्ली. त्या दिवसानंतर ते कांही फार काळ टिकले नाहीत आता गुलाबी पोरकी झाली. तिला काय करावे ते उम-जेना. पण पोराकडे पाहून तिने आपले मन घट्ट केले.

अकालीच पडलेल्या संसारी जबाबदारीच्या ओझ्याखाली ती गुदमरु लागली. झुरु लागली. पण लेकराकडे पाहून तिने सारे दुःख पोटात घातले. या पोटासाठीच ती दारोदार भटकली. एक दोन ठिकाणी तिला कामे मिळालीहि. पण तिथल्या वासनांच्या नज-रांमुळे तिला तेथे जाणे अशक्य होऊन बसले. नशिबा--लाच शिव्या देऊन आता ती तुकड्यासाठी दारोदार फिरते.

अंगावर लाज राखण्यापुरते कपडे, तेही सतरा ठिकाणी तोंड उघडलेले. अनवाणी पाय. पाठीमागून येणारे लेकरु. अशी ती उन्हातानातून फिरते. कोणा दयावंताने चार घास दिले तर तेथेच, त्याच्या वळच--णीला बसून, मायलेकरांनी खावे आणि पुढचा रस्ता धरावा. खरे म्हणजे चिमण्या पोराकडे पाहूनच ती आला दिवस भूतकाळात लोटत होती.

पण केवळ सहानभुतीवर किती दिवस भागणार? यासाठी अलिकडे ती वस्तीतल्या नाचगाणी करणाऱ्या मंडळीत मिसळली होती. आता तिचे दिवस पूर्वीपेक्षा बरे जात आहेत पण मन सतत मरते आहे याची

पोराला शाळेत पाठविण्याचा उत्साह तिने मोडलेला नाही.

आज दिवाळीचा पाडवा. कालच लक्ष्मीपूजन झाले होते. गावातील दुकानादुकानापुढे आरास केली होती. अनेक प्रकारच्या वाद्यांनी वातावरण दुमदुमून गेले होते. रंगीबेरंगी पोपाखातील बच्यांची आळीआळीतून धमाल उडून गेली होती.

एक - - - दोन - - - तीन - - - प्रत्येक दुकानापुढे, वाड्यापुढे, गुलाबी जात होती. देहभान विसरुन नाचत होती. ढोलकीवर कडाडणाऱ्या बोटांच्या तालावर तिची पावले थयथयत होती. लोकांच्या नजरा गाण्यापेक्षा तिच्यावरच अधिक खिळत होत्या. पण तिचे लक्ष त्यांच्या खिशावर होते. गुलाबी हातात थाळी घेऊन लोकांसमोरुन फिरत होती. कोणी पैसा टाकला की लवून रामराम करीत होती. कुणी फेटेवाला थाळीत पावली, अधेली टाकून बन्समोअरचा इशारा देत होता. गुलाबीच्या पायांना परत गती येत होती. ढोलकीवाला बोटे फिरवीत होता. साथीदार कानाला हात लावत होते.

क्षितिजाने सूर्यनारायणास आपल्या पोटात घेतले आणि गुलाबीने पायातील चाळ खाली ठेवले. चेहऱ्यावर घामाचे थेंब जमले होते. पदराने ते टिपून तिने खाली बैठक मारली. जमलेल्या पैशाची वाटणी झाली. गुलाबीला आज अपेक्षेपेक्षा भरपूर पैसा मिळाला. त्यातून तिने आपल्या लाडक्यासाठी मिठाई घेतली. एक नवा कोरा सदरा घेतला. आणि साथीदारांबरोबर वस्तीचा रस्ता धरला. सगळे हसत खिदळत निघाले - - -

वस्ती दिसू लागली. कुत्र्यांचे ओरडणे ऐकू येऊ लागले. पोरांचा गोंगाट कानी येऊ लागला. तिच्या पावलाने गती घेतली. मनात पोराचा चेहरा दिसू लागला. त्या तंद्रीतच ती वस्तीजवळ आली.

आपल्या झोपडीजवळ जमलेली गर्दी पाहून तिच्या काळजात चर्र झाले. मनातील कुविचारांचा कप्पा अस्थिर होऊ लागला. मन भारावून गेले. ती तशीच पुढे गेली. वस्तीतील बायकांचे व पुरुषांचे कुजबुजणे तिच्या कानी पडू लागले. तिला कशाचाच अर्थबोध होईना. मन आवरेना. धीर धरवेना. काकुळतीला येऊन तिने विचारले,

' तुमी असी काय बगताइसा? काय झालंया?'

गुलाबीच्या या प्रश्नाचे उत्तर कोणीच दिले नाही. प्रत्येकजण एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागला. गुलाबीला धीर धरवेना. ती अवळजवळ किंचाळलीच,

'काय झालं ते बिगीदिशान सांगा की मुडद्यानू.'

' तुझ्या चिम्याला - - - न्हेलं.'

' काय?'

' तुझ्या चिम्याला न्हेलं.'

' कुनी? '

' तुझ्या घोवानं. '

' कुट ?'

' आमास्नी काय ठाव. '

' आनी तुमी गप बसलासा?'

गुलाबीला पुढे बोलवेना. डोळ्यात पाणी जमले. तिची ही दशा पाहून एक म्हातारी पुढे आली व म्हणाली,

' बये, आमास्नी यवढं बी कळन न्हाई स्नव' आमी लई सांगितलं बग त्येला. पन तू गावात नाचायला गेलीस म्हून पोरानं सांगिटलं तसा त्यो पोराला भाईर वडाया लागला. आमी त्येला हाटिकलं, तर त्यो आमावरच गुरकायला लागला पन आमी काय पोराला सोडलं न्हाई बग. तसा त्यो गावात गेला, आन् चार पाच लोकास्नी घेऊनशान परत आला. आनी आमच्या हातातनं पोराला हिसकून घेऊन गेला बग पोरी !'

गुलाबीला दुःख असह्य झालं. मोठा हुंदका देऊन पोर नेल्या वाटेवरच तिने अंग टाकले. बाजारातून आणलेली मिठाईची पुडी मातीत विस्कटली होती सदरा बाजूला अस्ताव्यस्त पडला होता. सगळी वस्तीच हवालदिल झाली होती. आणि कुत्र्यांच्या रडण्यात गुलाबीचे रडे मिसळून गेले होते - - - -

□ □ □



# व्हियेतनामची समस्या

सुभाष धुमे
द्वि. व. साहित्य

आज आपणास संपूर्ण जगावर निरनिराळ्या प्रकारच्या संघर्षाचे सावट पडलेले दिसते आहे. अशा भयग्रस्त वातावरणात वावरत असताना संघर्षातून नेमके काय घडेल आणि यातून जगाचा नाश केंव्हा होईल हे सांगता यावयाचे नाही. या संघर्षातून जर जागतिक युद्धाची ठिणगी पडली तर जगाचा विनाश अटळ आहे, हे सुर्यप्रकाशा इतके सत्य आहे.

व्हियेतनामची समस्या हल्लीच्या अनेंक समस्यापैकी एक समस्या आहे. त्याठिकाणी आजपर्यंत मानवहानी भयंकर झाली असून संपत्तीचे देखील अमाप नुकसान झालेले आहे. हा प्रश्न संपूर्ण जगाची डोकेदुखी बनलेला आहे. या समस्येचाच मागोवा घेण्याचा प्रयत्न खालील लेखात केला आहे.

सुरवातीला उत्तर आणि दक्षिण व्हियेतनाम यांच्यात संघर्ष सुरू होता. हा संघर्ष मिटून त्यांच्यात सामंजस्य निर्माण व्हावे आणि शान्तता प्रस्थापित व्हावी याकरितां १९५४ साली प्रयत्न करण्यात आले होते. दोन्ही राष्ट्रं जरी मोठी शक्ती नाहीत तरी त्यांच्यात शांतता प्रस्थापित व्हावी असा या प्रश्नामागील हेतु होता आणि या प्रयत्नातूनच १७ अक्षांशावर युद्धबंदी करण्यात आली व ही दोन राष्ट्रं स्वतंत्र झाली.

यानंतर वास्तविक तेथे शांतता प्रस्थापित व्हावयास हवी होती तथापि झालेली फाळणी त्यांना कृत्रीम वाटू लागली त्यांच्यात सामंजस्य निर्माण होण्याऐवजी द्वेष भावना फैलावली गेली आणि यातूनच दक्षिण किंवा उत्तर व्हियतनाम यापैकी कोणाचे तरी पारिपत्य झाल्याशिवाय ही समस्या मिटणार नाही, युद्ध संपणार नाही, अशा प्रकारची भावना दोन्ह देशाच्या नागरि-कत्यांच्या मनामध्यें घर करून बसली. परंतु त्यावेळी स्व-सामर्थ्यावर लढून आपण विजय मिळऊ याबद्दल दोन्ही देशातील नेत्याना खात्री नव्हती. परकियांच्या मदतीने कां होइना ही समस्या कायम निकालात काढली जावी ही भावना उत्पन्न झाली. परकीय मदतीच्या संदर्भातच या प्रश्नामध्यें अमेरिका, रशिया-चीन या बड्या राष्ट्रांचा प्रवेश झाला. त्यावेळी उत्तर व्हियेतनामला हो-ची-मिन्ह सारखा धुरंधर नेता लाभला. तो लोकप्रिय होता. याच्या उलट दक्षिण व्हियेतनामला त्या तोडीचा नेता न मिळाल्यामुळे तेथील नेंतृत्व दुबळेच राहिले.

या दुबळेपणाचा फायदा उठवून हो-चि-मिन्ह बाद्यांनी दक्षिण व्हियेतनाममध्यें धुमाकूळ घालण्यास प्रारंभ केला. या त्यांच्या डावपेचामुळे सम्पूर्ण व्हियेतनाम हो-चि-मिन्हकडे जाण्याची भीति निर्माण झाली आणि स्वत:च्या बचावाकरितां म्हणून दक्षिण व्हियेतनामला अमेरिकेचा आसरा मिळवावा लागला, आणि त्यामुळे अमेरिका सैन्यासह दक्षिण व्हियेत-नामच्या पाठीशी सज्ज झाली. आता दक्षिण व्हियेत-नामचे वाढलेले बळ पाहून शत्रुपक्ष-उत्तर-व्हियेतनाम कसा गप्प बसेल ? त्यांना देखील परकीय मदतीचा आसरा घ्यावा लागला. रशिया व चीन त्यांच्या मदतीला धावून गेले. त्यामुळे हा संघर्ष केवळ दक्षिण व्हियेतनाम विरुद्ध उत्तर व्हियेतनाम असा राहिला नाही तर तो रशिया व अमेरिका या बड्या राष्ट्रांमधील वाद निर्माण झाला आणि मिटत असलेली समस्या अधिकच बिकट बनली.

त्यानंतर दोनही गटांकडून आपापले सामर्थ्य वाढ-विण्याचे प्रयत्न सुरु झाले. त्यामुळे व्हियेतनाम समस्या अधिक चिघळून जगाच्या चिंतेत दिवसे दिवस भर टाकत राहिली.

अशा प्रकारे जगव्यापी युद्धाचे सावट व्हियेतनाम-च्या रूपाने संपूर्ण जगावर पडले. तेथील परिस्थिति दिवसे दिवस स्फोटक बनत चालली. भावी जागतिक युद्ध लाठ्याकाठ्यांचे, तलवारीबंदुकांचे असणार नाही तर ते अण्वस्त्रांचे असणार हे उघड आहे आणि अण्वस्त्रांचा वापर म्हणजे संपूर्ण जगाचा

नाश हेहि ठरलेलेच आहे. अेका दृष्टीनें पाहिल्यास अमेरिकेला जागतिक शांतता नांदावी असेच वाटत आहे. परंतु पूर्व आशियात 'लाल' साम्राजवाद पसरु नये म्हणून अमेरिका सर्व सामर्थ्यांनिशी त्या ठिकाणी लढत आहे. या भूमेकेमुळेच हे युद्ध अधिकाधिक उग्र बनत गेले आहे.

१९६५ साली भारत पाकिस्तान यांच्यात युद्ध झाले त्यावेळी यूनोच्या मध्यस्थीनें शान्तता प्रस्थापित केली गेली. ही संधी साधून यूनोच्या मध्यस्थीनें व्हियेतनाम मध्यें शांतता निर्माण होऊन यद्ध संपुष्टात यावे असे अमेरिकेला वाटत होते. आणि ते शक्य होइल असेहि वाटत होचे. कारण भारत पाकिस्तान संघर्ष मिटवून शान्तता प्रस्थापित करण्यामध्यें रशियाच्या मध्यस्थीचा सिंहाचा वाटा होता हे सर्वश्रुतच आहे. या त्यांच्या प्रयत्नातूनच अप्रत्यक्षरीत्या का असेना परंतु रशियाला देखील शांतता हवी होती असा निष्कर्ष काढल्यास चूक ठरणार नाही.

अमेरिकेला व रशियालाही जर शांतता हवी होती तर मग व्हियेतनाम युद्धात शांतता का निर्माण होऊ शकली नाही ? चीनमुळेच केवळ व्हियेतनाममध्यें शांतता नांदू शकलेली नाही असे विधान केल्यास चुकीचे होणार नाही. कांही प्रमाणात व्हियेतनाम प्रश्नावर जरी रशिया व चीन यांच्यात अेकमत असले तरी इतर बाबतीत त्यांचे किती मतभेद आहेत हे जगजाहीर आहे. यामुळे व्हियेतनाममध्यें शांततेचे प्रयत्न होऊ शकले नाहीत. उलट युद्ध वाढतच गेले. हा प्रश्न दोनही बाजूच्या प्रतिष्ठेचा बनला.

या धामधुमीच्या काळात मध्यंतरी अमेरिकन हल्ल्यांचा जोर वाढला. उत्तर व्हियेतनामच्या राजधानीवर, तेल साठ्यावर जोरदार हल्ले झाले याचा बदला घेण्यासाठी पर्यायाने आपले सामर्थ्य वाढविणे हो-चि-मिन्हना भाग होते. तद्रुप त्यांनी रशिया-चीन यांच्याकडे धाव घेतली व सामर्थ्य वाढीचा प्रयत्न केला. या काळात अमेरिकेत सार्वत्रिक निवडणूका झाल्या. राष्ट्राध्यक्षपदी निक्सन यांची निवड झाली आणि त्यामुळे व्हियेतनाम युद्धाकडे पहाण्याची दृष्टी पार बदलून गेली. निवडणूक विशेषत: या प्रश्नावर लढविली गेली आणि या प्रश्नावर आपण शांतता प्रस्थापनेकरितां सर्वतोपरी प्रामाणिक प्रयत्न करु असे त्यांनी आश्वासन दिले होते. त्याचे पालन त्यांचेकडून होत असल्याचे दिसते. अधिकारग्रहण २० जानेवारी ६९ रोजी केल्यानंतर त्यांनी उत्तर व्हियेतनामशी अनेकवार शांततेची बोलणी केली. याची सुरुवात म्हणून दक्षिण व्हियतनाममधून आपले सैन्य कमी करण्याची त्यांनी घोषणा केली. फक्त घोषणा केली नाही तर आजपर्यंत प्रत्यक्षात त्यांनी ६०,००० सैन्य काढून घेतले असून येत्या एप्रील पर्यंत तेथील एकूण १,१५००० सैन्य कमी होणार आहे अशा प्रकारे शांतता प्रस्थापित होण्याच्या दृष्टोने वाटचाल सुरु असून महत्वाची पावले अमेरिकेचे राष्ट्राध्यय निक्सन यांच्याकडून उचलली जात आहेत. परतु अेका हातानें टाळी वाजू शकत नाही. तद्वतच उत्तर व्हिएतनाममधूनहि शांततेकरितां पावले पडली पाहिजेत. तरच ही जागतिक समस्या संपुष्टात येऊन शांतता प्रस्थापित केली जाईल.

व्हियेतनाम युद्धात आजवर कोट्यावधि रुपयांच्या मालमत्तेची हानी झालेली आहे. त्याचप्रमाणें मोठ्या प्रमाणावर मानवहानी झालेली आहे. अेक अेक खेडे बेचिराख करुन टाकलेले आहे. अशा प्रकारच्या युद्धाचा परिणाम इतर राष्ट्रांच्या जीवनावर झाल्यास नवल वाटणार नाही. मोठ्या राष्ट्रांना परिणाम भोगावे लागतात.किंबहुना या समस्येंत संपूर्ण जगाच्या विनाशाचा प्रश्न आहे. म्हणूनच जागतिक शांततेसाठी धडपड करणाऱ्या यूनोतर्फेहि तेथे अनेकवेळा वाटाघाटी झाल्या पण त्यांना फारसे यश अजून तरी मिळालेले नाही.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड एम. निक्सन यांचा दृष्टिकोण शांततेचा असल्याचे वर सांगितले आहेच. त्यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हातीघेतल्या नंतर व्हियेतनामच्या युद्धाच्या संदर्भात शांतता प्रस्थापित व्हावी याकरितां आपण कसे प्रयत्नशील आहोत, हे मुलाखतीद्वारा अनेकवेळा सांगितले असून प्रतिपक्षानें साद दिल्यास तेथे शांतता निर्माण होऊन युद्ध संपुष्टात येण्यास वेळ लागणार नाही, असे वारंवार सांगितले आहे. गेल्या जूनमध्ये राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी सैन्य कपात करण्याची पहिली घोषणा केली. त्यावेळी अमेरिकन लोकांना उद्देशून केलेल्या भाषणात शांततेच्या संदर्भात त्यांनी तीन कसोट्या सांगितल्या

१) युद्ध लढविण्याचा भार स्वीकारण्याकरिता दक्षिण व्हियेतनामी सैनिकांना प्रशिक्षण देण्यात होणारी प्रगती.

२) पॅरिस येथील वाटाघाटीत होणारी प्रगती.

३) शत्रूंच्या कारवायांची पातळी.

पहिली कसोटी सांगताना त्यांनी सायगाव व अमेरिकेच्या मदतीचा उल्लेख केला आहे. पॅरिस येथील वाटाघाटीच्या संदर्भात ते म्हणाले की तेथील वाटाघाटी व शत्रूच्या युद्धकारवाया याबाबत फारसा उत्साह नाही. असे जरी त्यांनी सांगितले असले तरी ते निराश झाले नाहीत. १५ डिसेंबर ६९ रोजी जनतेला उद्देशून केलेल्या भाषणांत श्री निक्सन म्हणाले होते, 'व्हियेतनाममधील अमेरिकन सैन्याची अलीकडील कपात म्हणजे व्हियेतनाममध्ये शांतता स्थापन करण्यातील आमच्या योजनेचा आणखी अेक टप्पा आहे हे युद्ध संपुष्टांत आणून न्याय व शांतता प्रस्थापित करण्याच्या आमच्या तयारीचे हे चिन्ह आहे ' (दूर चित्रवाणी भाषण)

निक्सन यांच्या भाषणातून व मुलाखतीतून शांततेची तळमळ दिसून येते. आणखी अेका मुलाखतीत ते म्हणतात युद्ध संपण्याकरिता अमेरिका-व्हियेतनाममध्ये योग्य मार्गाचा अवलंब करीत आहे आता यास उत्तर व्हियेतनामने प्रतिसाद देणे आवश्यक आहे, आम्हाला युद्ध संपावे असे जरी वाटत असले आणि आमचे पाऊल शांततेच्या दृष्टीनें पडत असले तरी व्हियेतनाममध्ये 'लाल' भाइचे जाळे पसरू नय या करिता अमेरिका जागरूक असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. यावरून त्यांचे धोरण स्पष्ट होण्यास मदत होइल.

वास्तविक पाहता आजच्या जगापुढे लोकसंख्यावाढ अन्नधान्य उत्पादन, आंतरराष्ट्रीय व्यापार व नाणेंबाजार अशा अनेक समस्या आहेत. या पार्श्वभूमीवर जागतिक शांतता ही आज साऱ्या जगाचीच डोकेदुखी झालेली आहे. खरे पाहिले असता सगळ्या जगालाच आज मनापासून शांतता हवी आहे. कारण नवे जागतिकयुद्ध अण्वस्त्राने खेळले जाणार असल्याने सगळ्या जगाचाच नाश होइल हे सर्वांनाच पटलेले आहे.

असे असूनही कुठे ना कुठे संघर्षांची ठिणगी पडण्याचे प्रसंग निर्माण होताहेत. सुवेझ कालव्याच्या प्रश्नात, क्यूबाच्या संदर्भात, अरब इस्त्राईलच्या संदर्भात असे प्रसंग निर्माण झाले होते. सुदैवाने या प्रसंगातून युद्धाची ठिणगी पडली नाही. तथापि सर्व देशांच्या अंतरंगात काय चालले आहे याची यावरुन आपल्याला कल्पना येईल.

शांततेच्या संदर्भातच अण्वस्त्रांच्या प्रश्नाचा समावेश होतो. अणुशक्तीचे सामर्थ्य हे आज युद्धसामर्थ्य होऊन बसले आहे. आणि युद्धशस्त्र हे कधीही शोभेची वस्तू होऊं शकत नाहीं. त्याने केंव्हाना केंव्हां विनाश होणारच. आणि कोणतेहीं सामर्थ्य माणसाला गप बसू देत नाही. शिवाय माणसाच्या मनातली स्वामित्वभावना, दुसऱ्यावर सत्ता गाजविण्याची ईर्षा, साम्राज्यवादाची सुप्त भावना अजून संपूर्णपणे गेलेली नाही. त्यामुळे शांतता हवी असूनही कुठे ना कुठे युद्धाचा भडका उडण्याचे क्षण राष्ट्रांच्या जीवनात आंजही येत आहेत, अण्वस्त्रबंदीच्या प्रयत्नात, बर्ट्रांड रसेल सारख्या विचारवंतानाही हात टेकावे लागले आहेत, असे त्यांनीच अलिकडच्या आपल्या अेका मुलाखतीत मोकळेपणाने कबूल केले आहे. तेव्हा जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी माणसातल्या प्रवृत्तीच बदलल्या पाहिजेत. आणि हे काम सोपे तर नाहीच, शिवाय ते बऱ्याच कालावधीचे आहे हे कुणालाहि मान्य व्हावे.

□ □ □

# धुंद येथ मी ---

**कु. कला तोरगल्ली**
द्वि. व. साहित्य

रागदारीच्या सुरेल स्वरगंधानी, स्वरवळयांच्या माधुर्यांनी आणि सुरावटीच्या लाटांनी सारा आसमंत बहरला आहे. स्वर-शरद पौर्णिमेच्या चांदण्यानी मान्यांची मने उजळली आहेत. दिडदा ऽ दिडदानी वातावरणाला पदन्यासाची धुंदी आली आहे. नि अशा नादलुब्धतेत जीवनांचं सर्वस्व शून्यातून साकारत ब्रम्हत्वात विलीन होऊ पहात आहे

जीवनाच्या हिरवळीवर काळाची लता झोके खाताना मानवाच्या मनाला ज्या क्षितिजाकडं भरारी घ्यावी अशी वाटते, किंबहुना ज्या इंद्रधनुष्याकडं त्याची मन-कलिका झेपावते त्यातील सप्तरंगी आकर्षण अनेक पैलूत घडविलेले असते. नि या पैलूतच नादब्रह्माची सुरावट आपली गेयता रेखून जाते. या नादाला आपल्या शैलीदार भाषेत गुंफताना–

"कुंभ रसाचे शिरी घेऊनी शब्दांच्या गवळणी
नजरे पुढती ठुमकत येती रुपवती कामिनी"

अशा अलंकारानी कवयित्री संजीवनी मराठे गाऊन जातात. आणि एक चित्रमय चित्रपटी डोळ्यासमोर साकारुन जाते

मनाच्या चाळणीतून सुखाचे क्षण चटकन् निघून जातात. पण दुःखाचे क्षण मात्र कायमचे अडकून राहतात. पण असे दुःखाचे क्षण सुद्धा विसरायला लावून आशेची चंदेरी प्रभा जीवन क्षितीजावर निर्माण करण्यात संगीत-कला सामर्थ्यवान ठरते. मानवी जीवनाच्या रंगमंचकावर अनेक तीव्र घणांची बोचणी मनाला ग्रासून टाकते. या वाळवंटी प्रवासात अनेक प्रकारचे चटके प्रसर असतात. या चटक्यांची तीव्रता विविध कलांच्या झुळझुळणाऱ्या निर्झरांनी सौम्य केली जाते. जीवन-विकास साधणाऱ्या कलांत संगीताने आपले कांहितरी स्थान सिद्ध केले आहे.

Music directly appeals to the human Emotions

संगीत सरळ सरळ माणसाच्या काळजाला हात घालते. म्हणून ते सर्व कलांमध्ये श्रेष्ठ आहे असे रसविमर्शकरांनीहि म्हटलेले आहे. पुन्हा ते विविध गीत दालनांनी विनटलेले आहे. या सर्वांत बालखीची तेजोमयता तर आहेच, पण भावनेच्या प्रत्येक निळाईत विराजित असलेले नाट्यसंगीतही मन प्रसन्न करुन जाते.

नाट्यसंगीत हा मराठी रंगभूमीचा अमोल वारसा आहे! मराठी रंगभूमीवरील नाट्य-संगीताची जडण-घडण ज्या गायनाचार्यांनी केली त्यात मानाचे पद द्यावे लागेल ते गायनाचार्य भास्करबुवा बखले याना! बखलेबुवांच्या स्वरकल्पनांना रंगभूमीवर साकार केले अनेक गायकनटांनी, आणि या सर्वांना अवसर दिला आण्णासाहेब किर्लोस्करांनी. त्यांचा वारसा मराठी रंगभूमीवर आजही वावरताना दिसतो भास्करबुवा बखले म्हणजे संगीताच्या दुनियेतील अवतारी पुरुष! या तेजस्वी भास्कराचा उदय होण्यापूर्वी मराठी रंगभूमीवर, मराठी रसिकांच्या हृदयसिंहासनावर नाट्य-संगीत विराजमान झालेले होतेच! मराठी रंगभूमीवर अनेकांनी आपल्या कोमल स्वरांची बाग फुलविली. मधुर चालीत गुंफलेल्या पदांची रत्नमाला रंगदेवतेच्या गळ्यात घालून मराठी रंगभूमीवरुन संगीताला अधिकच खुलवून टाकत.

ईश्वरी वरदानाचं प्रतीक म्हणून ज्यांना संगीताचा साज लाभला त्या व्यक्तीच्या सहवासात गंगेची निर्मलता लाभते. शब्दांना लाभणारी सुरांची संगत नि त्याला लाभणारी आशयानुकूल अभिव्यक्ती हा खरोखर संगीतातील त्रिवेणी संगमच! नि या संगमात जे निर्मल जल आपली आभा विकसते त्यात जणू शालीन पऱ्यांचे नकळत आव्हान लपते–

"आम्ही कुलीनांच्या कन्या चाफेकळ्या पानाआड
मूळं मांड ना आराम मऊपणं लाव वेड"

संगीताच्या आसमंतात बरोबर जीवनाचे एक आल्हाद दालन आपले वैभव विखरित असते. नि ह्या नादात जी कलंदर भावना, जी मुक्त भरारी असते तिचा अविष्कार काही आगळाच ! पेटी नि तंबोऱ्या-सारख्या निर्जीव भासणाऱ्या वाद्यातून कुशल हातानी शब्दांचा संगीत अविष्कार साधला काय किंवा गोड गळ्यातून उतरलेला संगीताचा एखादा भारावलेला स्वर काय, जीवनाचा प्रासाद खचितच भारावतो. आणि वाटत स्वरवंदनेतच मनाशी स्वरसाधना करीत रहाव, या सुरांच्या संगतीतच मनाशी जपलेली कितीतरी स्वप्न साकार करावी, आणि एका उच्चतम चारुतेत जीवन साफल्याची मगलता स्थापू द्यावी.

संगीताच्या आस्वादाने लाभणारी धुंदी माणसाला तल्लीन करून टाकते एक प्रकारची तंद्री निर्माण करते ही एक प्रकारची भावनिक समाधी होय. आध्यात्मातील समाधी फार फार अवघड, पण सामान्य प्रापंचिकालाही अगदी सुलभतेने भावनेच्या जगातील ही समाधि प्राप्त करून घेता येते. संगीताच्या एखाद्या मैफलीत स्वतःला हरवून घेऊन . . . . मग बोचणारी दुःखही सौम्य होतात, काही क्षण तरी विसरली जातात.

स्वराचे नाते ब्रम्हयाशी असते. म्हणूनच ओंकार हे पहिले स्वरसंमेलन आणि म्हणूनच शून्यामध्ये स्वराच्या वगाहनी प्रतिभावंतानी निर्माण केल्या. निर्मीतीक्षमतेची ही अत्यंत तरल जाणीव संगीतातून व्यक्त होते. संगीताने व्यापलेल्या धुंद क्षणांची आठवण ही एक मनाला लाभलेली फार मोठी मौक्तिके आहेत. म्हणून संगीताची मैत्री म्हणजे . . . .

जीवनमार्गावरती क्षणभर येता-जाती किती सुज्जन सखे ! आपुला युगायुगांचा, स्नेहपरी राहील चिरंतन

□ □ □



# बँकांचे राष्ट्रीयीकरण

शेखर हत्ती
द्वि. व. वाणिज्य

सध्या भारतात चौदा प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण झालेले आहे. या राष्ट्रीयीकरणामुळे देशांत सर्वत्र एक चैतन्याची लाट पसरलेली असून विविध स्तरांतील सामान्य जनतेच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. परंतु हेही तितकेच खरे आहे की बँकेच्या राष्ट्रीयीकरणाचे वारे अजून ग्रामीण भागापर्यंत जाऊन पोहोचलेले नाहीत. जर राष्ट्रीयीकरणाची उद्दिष्टे सफल करावयाची असतील तर राष्ट्रीयीकरणाचे वारे प्रथम ग्रामीण भागापर्यंत नेऊन पोहोचविण्याचे कार्य केले पाहिजे. कारण भारतात जवळजवळ शेकडा ८२ लोक खेडेगावातून राहतात.

बँक राष्ट्रीयीकरणाचे वारे जर ग्रामीण भागापर्यंत नेऊन पोहोचवावयाचे असतील, तर बँकेच्या अधिकाऱ्यांनी ग्रामीण भागांत जाऊन अशिक्षित जनतेला बँकिंगची संपूर्ण माहिती द्यावी व बँकेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यास त्यांना उद्युक्त करावे. त्यामुळे बँकिंगचा प्रसार होईल व असा प्रसार झाल्यामुळे त्या लोकांना बचत करण्याची सवय लागेल व अशा तऱ्हेने मोठ्या प्रमाणावर जमलेला बचतीचा पैसा हा जर देशांतील मोठ्या व छोट्या उद्योगधंद्यांना शेतीसाठी इ. कारणासाठी कर्ज म्हणून दिला तर देशातील एकूण उत्पादनक्षमता वाढेल व त्यामुळे देशातील उद्योगधंद्यांच्या वाढीचा वेग देखील वाढेल.

सध्या भारतात मोठमोठ्या शहराच्या ठिकाणी बँकेची एकूण संख्या फार मोठी असते. वास्तविक पाहता तेथे जरुरीपेक्षा जास्तच बँकेची संख्या असते. अशा तऱ्हेने अनावश्यक ठिकाणी बँकांनी आपल्या शाखा न उघडता त्याच शाखा जर जरुरीच्या ठिकाणी उघडल्या तर त्याचा उपयोग जनतेला देखील होईल व बँकींगचा प्रसार देखील होईल. तसेच ज्या ठिकाणी नजीकच्या भविष्यकाळातही बँकेची शाखा उघडणे व्यवसायाच्या दृष्टीने शक्य नसते, अशा ठिकाणी फिरते प्रतिनिधी ठराविक दिवशी पाठवावेत. अशा तऱ्हेने देशाची एकंदर बँकिंग व्यवसायाची गरज लक्षात घेऊन त्यात समतोल साधण्याचा प्रयत्न बँकेमार्फत व्हावा. सध्याचे बँकींग व्यवसायाचे धोरण देशातील सर्व विभागांना सारखेच लागू आहे. परंतु भारत हा देश विविधतेने नटलेला आहे, त्यामुळे बँकेचे धोरण हे कांहीं विभागांना अनुकूल ठरते तर कांही विभागांना ते प्रतिकूल ठरते. तेव्हा शासनाच्या दृष्टीने व बँकेची धोरणे यशस्वी होण्याच्या दृष्टीने देशाचे विविधतेनुसार निरनिराळे विभाग पाडवावेत व त्या निरनिराळ्या विभागाच्या प्रगतीला पोषक ठरतील अशा निरनिराळ्या धोरणाचा अवलंब त्या त्या विभागासाठी करावा.

बँकांच्या साधनसंपत्तीचा सामाजिकदृष्ट्या उपयुक्त व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर विनियोग करावयाचा असेल तर बँकांनी शेती व्यवसाय, छोटे व मोठे उद्योगधंदे किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील उत्पादक उपक्रमाला जास्तीत जास्त मदत करावी. यामुळे उत्पादन वाढेल व रोजगारीस वाव मिळेल. तेंव्हा बँकांनी खालील व्यवसायांना मोठ्या प्रमाणावर कर्जे देण्याची व्यवस्था करावी.

१) छोट्या व मोठ्या उद्योगधंद्यांना कर्जे :- भारतात मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्याची वाढ होणे आवश्यक आहे. त्यासाठी बँकांनी उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणावर कर्जे उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी. छोट्या व मोठ्या उद्योगधंद्यांना यंत्रे खरेदी करण्यासाठी, कारखान्यांच्या वाढीसाठी किंवा आधुनिकीकरणासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जाची आवश्यकता असते तर नोकरांचा पगार देण्यासाठी किंवा दररोजच्या किरकोळ खर्चासाठी अल्प मुदतीच्या कर्जाची आवश्यकता असते. तेंव्हा बँकांनी छोट्या व मोठ्या उद्योगधंद्यांना दीर्घ मुदतीचे व अल्प मुदतीचे कर्ज मोठ्या प्रमाणावर त्यांच्या गरजेनुसार उपलब्ध करून द्यावेत.

२) शेतीसाठी :- भारत हा देश प्रामुख्याने शेती प्रधान देश आहे. भारतातील जवळ जवळ ७० % लोक शेतीव्यवसायावर अवलंबून आहेत. तेंव्हा शेती व्यवसाय करणाऱ्यांना देखील कर्ज उपलब्ध करून देणे महत्वाचे

ठरते. शेती व्यवसायात औजारे खरेदी करण्यासाठी, विहिरी खोदण्यासाठी, जमीन लागवडीयोग्य करण्यासाठी इत्यादी कारणासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जाची आवश्यकता असते, तर जतूनाशक औषधे घेण्यासाठी, खते घेण्यासाठी इ. कारणासाठी अल्प मुदतीच्या कर्जाची आवश्यकता असते. त्यामुळे शेती व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणावर बँकांनी कर्जे उपलब्ध करुन द्यावेत. तसेच निरनिराळ्या ठिकाणी सेवाकेंद्र सुरु करुन अशा केंद्रातून छोट्या शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, पप वगैरे गोष्टी भाड्याने देण्याची व्यवस्था करावी.

३) शेतीस सलग्न असलेल्या व्यवसायासाठी :– भारतातील शेती हा व्यवसाय हंगामी व्यवसाय आहे. भारतातील शेतकरी हा १२ महिन्यापैकी फक्त ४ ते ६ महिने शेतात राबत असतो व उत्पादन काढीत असतो व राहिलेल्या सहा महिन्यात तो मोकळाच असतो. तेंव्हा बँकांनी शेतकऱ्याना दुग्धव्यवसाय कोंबड्या पाळणे ह्या सारखे शेतीस सलग्न असलेले व्यवसाय करण्यास प्रोत्साहन द्यावे. त्यामुळे शेतकऱ्याना मोकळ्या वेळी व्यवसाय मिळून त्यांचे राहणीमान वाढेल व त्याचबरोबर राष्ट्रीय उत्पन्न देखील वाढण्यास मदत होईल.

तसेच किरकोळ व्यापाऱ्यांना कारागिरांना हस्तव्यवसाय करणाऱ्यांना, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्यासाठी, इत्यादिसाठी देखील बँकानी कर्जे द्यावीत. स्त्रियांच्या शक्तीचा उपयोग जर उत्पादन कार्यासाठी वापरला गेला तर देशाची उत्पादनक्षमता वाढेल व त्याचबरोबर राष्ट्रीय उत्पन्न देखील वाढेल. त्यामुळे बँकांनी स्त्रियांचे जे व्यवसाय असतात त्यांना देखील प्रोत्साहन द्यावे.

परंतु वरील कर्जे जनतेस मिळण्यास सध्याच्या बँकिंग व्यवसायात कांही अडचणी आहेत. प्रथम त्या अडचणी बँकांनी दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पहिली अडचण म्हणजे सध्या कर्जे ही तारणावर दिली जातात. तर आता बँकानी कर्जे तारणावर न देता ती गरजेनुसार द्यावीत ह्यामुळे गरीबातल्या गरीब माणसाला देखील कर्ज मिळून त्याला स्वतंत्र व्यवसाय उभा करता येईल. दुसरी अडचण म्हणजे कर्जे देताना लाचलुचपत व वशिलेबाजी फार चालते. बँकांनी आता यापुढे कर्जे देत असतांना वशिलेबाजी लाचलुचपत ह्यासारखे गैरप्रकार चालू देऊ नये. अर्थात कर्जे देत असतांना प्रामाणिक व कुशल माणसांचे च निवड करण्याचे पथ्य पाळावे लागेल. व नंतर कर्ज दिल्यानंतर त्या कर्जाचा वापर योग्य कारणांसाठी व योग्य प्रकारे खर्च होतो किंवा नाही ह्यावर सक्त नजर ठेवावी.

बँकिंगचा व्यवसाय हा फायद्यासाठीच केला जातो. परंतु आता ह्या फायदा मिळविण्याच्या दृष्टीकोनात थोडासा बदल केला पाहिजे– बँकांनी आता फायद्याकडे न पाहता जनतेची सेवा आपल्याला जास्त कशी करता येईल इकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. बँकानी शक्यतो सामान्य जनता जी असते त्याना जास्तीत जास्त मदत करण्याचे धोरण ठेवावे. त्यामुळे सामान्य जनतेचे राहणीमान सुधारेल व राष्ट्रीय उत्पन्नात समतोल निर्माण होण्यास मदत होईल. तसेच ह्या राष्ट्रीयीकरणांमुळे सत्तारुढ पक्ष ह्या बँकांचा उपयोग स्वार्थासाठी करुन घेण्याची शक्यता आहे तेंव्हा शक्यतो बँका सरकारी यंत्रणेपासून दूर ठेवाव्यात. कारण देशाची प्रगती ही बँकिंग व्यवसायावर अवलंबून असते. अशा वेळी बँकेचा उपयोग जर योग्य कारणासाठी झाला नाही तर देशाची प्रगती ही कधीच होणार नाही.

राष्ट्रीयीकरणानंतर बँकामध्ये स्पर्धा असावी की असू नये याबाबतीत मला असे वाटते की, एक बँक दुसरीपेक्षा चांगल्या प्रकारे कार्य करू शकते हे दाखविण्यासाठी चढाओढ ही असलीच पाहीजे. चढाओढ नसेल तर, प्रत्येक बँकेची वाढ खुंटेल व बँक ही एक व्यापारी संघटना न राहून सरकारी खात्याचे स्वरूप येईल. यामुळे अखेर जनतेचेच नुकसान आहे. मात्र चढाओढ कायम ठेवली तरी बँकांच्या कारभारात सुसूत्रता आणि आधुनिकीकरण व्हावयास हवे. तरच त्या कार्यक्षम पद्धतीने जनतेची सेवा करू शकतील.

राष्ट्रीयीकरणाची उद्दिष्टे पूर्णांशाने सफल करावयाची असतील तर बँकेच्या कर्मचारी वर्गाचा दृष्टिकोन नव्या बदलास अभिमुख करणे हे सर्वात महत्वाचे काम आहे. दुसरे म्हणजे बँकांनी आपली सेवा अक्षरशः लोकांच्या दारापर्यंत नेऊन पोहोचविली पाहिजे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी बँकांनी आपल्या शाखा उघडून लोकांना बचत करण्याची सवय लावली पाहिजे व उत्पादक हलचालींना पत उपलब्ध करून दिली पाहीजे. कारण त्यातूनच लहानमोठे उद्योगधंदे निर्माण होत असतात व देशाच्या एकूण विकासास चालना मिळत असते त्याचबरोबर जास्तीत जास्त सामान्य जनतेला सहाय्य करुन त्यांचे राहणीमान वाढविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. अशा तऱ्हेने सामान्य जनतेचे राहणीमान वाढले तर राष्ट्रीय उत्पन्नात समतोलपणा निर्माण होण्यास मदत होईल. तेंव्हा वरील सर्व गोष्टींचा बँकांनी बारकाईने अभ्यास करुन त्यादृष्टीने शक्यतो लवकर पाऊले उचलावीत. □

# व्यथा

कुलकर्णी बी. आर.
द्वि. व. वाणिज्य

माणसाचं जीवनच असं चमत्कारिक नि विचित्र असत की जी गोष्ट तो विसरण्याचा अटोकाट प्रयत्न करतो नेमकी तीच गोष्ट तो कधीच विसरु शकत नाही. विस्मृतीच्या ज्या पडद्याखाली तो आपल्या दुःखद पूर्व-स्मृती लपवू पाहतो तो पडदाच दैवगतीच्या झंझावातात कुठल्याकुठे नाहीसा होतो आणि त्याच्या दुःखद स्मृती उघडधावाघडया पडतात. आणि त्यामुळं ज्याची अपेक्षाच तो कधी करत नसतो ते दुःख अनपेक्षितपणे त्याच्या वाटयाला येतं.

तसं नसतं तर मंगल त्या दिवशी माझ्याकडे आली असती का ? चाफेकळी सारखं धारदार नाक असलेली, गव्हाळी रंगाची, निळ्या पण टपोऱ्या नि तेजस्वी डोळ्यांची आकर्षक नि मोहक चेहऱ्याची, सुदृढ व सुडौल बांध्याची मंगल, जिच्यावर मी गाढ निस्सीम, उत्कट, अलौकिक प्रेम केलं होतं. तीच मंगल एक महिन्यापूर्वी मला न सांगताच कुठेतरी निघून गेली होती. तसं पाहता ती मला सांगितल्याखेरीज कुठंही जात नसे. पण त्यावेळी ती अशी अचानक मला न सांगताच कशी गेली याचंच मला राहून राहून आश्चर्य वाटत होतं. ती गेली नि काही दिवसांनीच तिचं लग्न ठरल्याची गोष्ट माझ्या कानावर आली. माझं तिच्यावर प्रेम होत. त्यामुळं "असं होणं शक्य नाही," असं माझं मन मला सांगत होत. त्यामुळं प्रथम या अफवेवर माझा विश्वासच बसला नाही. पण आता मात्र मला हे खरं वाटू लागलं होत आणि मंगलला विसरण्याचा मी प्रयत्न करीत होतो.

ते माझं बी. ए. चं शेवटचं वर्ष होतं. परीक्षा अगदी महिन्यावर येऊन ठेपली होती. त्यामुळं मला जोरात अभ्यास करणं भाग होतं. असाच त्या दिवशी अभ्यासाचे पुस्तक हातात घेऊन मी माझ्या खोलीत आरामखुर्चीत रेलून बसलो होतो. वाचण्याचा प्रयत्न करीत होतो. पण का कुणास ठाऊक अभ्यासात मनच लागत नव्हतं मन नुसत इकडे तिकडे भरकटत होतं आणि मी मनाला अभ्यासात . . . . पुस्तकात जखडून ठेवण्याचा प्रयत्न करीत होतो. तोच दारावर 'टकटक... टकटक' असा आवाज ऐकू आला. मला उठायचा कंटाळा आला होता. पण नाइलाजानं (आणि थोडयाशा नाखुषीनंही) मी दार उघडलं. आणि पाहतो तो दारात उभी होती भांबावलेली 'मंगल' ! क्षणभर भांबावलेल्या . . . गोंधळलेल्या नजरेनं आम्ही एकमेकांकडं पहातच राहिलो. जेव्हा मी भानावर आलो तेव्हा म्हटलं, " ये ना आत."

तशी ती आत आली आणि कॉटवर बसता बसताच एकदम ओक्साबोक्सां रडू लागली. तिला काय झालं हे मला कळेना. काय करावं हेहि मला सुचेना. तेवढयात ती दुःखावेगानं मला म्हणाली

" श्रीकांत . . . . श्री, क्षमा कर मला . . . . मी तुला फसवलंय, श्री फसवलं मी तुला."

अखेर मी ऐकलेलं खरंच होतं तर ! पण मी मात्र काहीच माहीत नसल्याच्या अविर्भावात म्हणालो, "अग असं काय करतेस वेडयासारखं! तुझ्याकडून अशी कोणती चूक घडली आहे की तू माझी क्षमा मागतेस?"

" माझ्याकडून तुझा फार मोठा, अक्षम्य असा अपराध घडलाय . . . श्री ! लग्न ठरलंय माझं. मी तुझ्यावर प्रेम केलं पण . . . पण . . . "

" पण काय ? आपल्या प्रेमाबद्दल तू तुझ्या बाबांना काहीच सांगितलं नाहीस ?"

"सांगितलं, सारं सारं काही सांगितलं, पण . . पण त्यांच्या हेकेखोरपणापुढं माझं काहीच चाललं नाही आणि नाइलाजानं अखेर मला लग्नाला तयार व्हावं लागलं."

मंगलच्या या एकेक शब्दागणिक माझ्या हृदयावर घाव घातल्याप्रमाणं वाटू लागलं . . . . हृदयाच्या चिंधडया चिंधडया झाल्या . . . . मनाच्या जखमेतून भळभळ रक्त वाहू लागलं. डोळ्यात अश्रू तरारुन आले . . . . पण ते ओघळणार तोच मी महत्प्रयासानं

स्वतःला सावरलं आणि मनावर संयमाचा दगड ठेवून स्वतःच्या वेदना . . . . दुःख . . . . व्यथा, सारं सारं सहन केलं कारण . . . . .

कारण तिच्या बापाच्या हेकेखोरपणाची मला कल्पना होती. म्हणे बाप ! बाप कसला तो . . . . ताईच्या . . . . मंगलच्या सावत्र आईच्या हातातलं कळसूत्री बाहुलंच होतं ते ! ती जशी खेळवेल तसंच तो खेळत होता . . . . नाचत होता. आणि आई . . . ती आई तरी कसली ? कैदाशीणच ती ! कारण मातृत्वाचा . . . , वात्सल्याचा लवलेशही तिच्याठायी नव्हता. आणि असणार तरी कसा म्हणा ? कारण किती केलं तरी मंगलची सावत्र आईच ती ! आणि तिच्याच सांगण्यानं बिचारी उषा . . . मंगलची मोठी बहिण आत्महत्येला प्रवृत्त झाली होती. उषाचं एका तरुणावर प्रेम आहे हे कळताच तिच्या सावत्र आईनं आणि पर्यायान बापानंही तिच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्याशीच लग्न करण्याची जबरदस्ती केली होती. आणि त्यामुळंच उषानं आत्महत्या केली होती. ही गोष्ट मला आठवली मात्र . . . आणि माझ्या अंगावर काटाच उभा राहिला. आणि याच प्रसंगाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून काही घडलंच नाही अशा अविर्भावात मी तिची समजूत घालू लागलो,

" मंगल . . . मंगल, मोठी माणसं आपल्यावर जिवापाड प्रेम करतात, पण आपली मनं . . . आपल्या भावना मात्र जाणून घेत नाहीत. त्यापेक्षा मंगल, तू असं कर, माझं ऐक, मला विसरून जा. आणि लग्न करून सुखी हो. तुझ्या सुखातच मी माझं स्वतःचं सुख पाहीन."

खरंच, मी मंगलला 'मला विसरून जा' असं सांगत होतो. पण मी तरी तिला विसरू शकत होतो का ?

तहानेनं व्याकूळ झालेल्या माणसाच्या ओठाजवळ अमृताचा पेला यावा तसंच मंगलनं माझ्या रुक्ष . . . , ओसाड जीवनात प्रवेश केला होता. माझं सारं जीवनच तिनं बदलून टाकलं होतं. पण . . . आज . . . आज तोच अमृताचा पेला माझ्यापासून हिरावून घेतला जात होता. स्फुंदत स्फुंदत मंगलनं मला विचारलं,

" श्री . . . , रागावलास माझ्यावर ?"

" नाही मंगल, मी रागावलोय तो स्वतःवर, स्वतःच्या विफल जीवनावर ! मंगल . . मंगल नाहीतरी जीवन . . . जीवन म्हणजे तरी काय ? जीवन म्हणजे संघर्ष ! जीवन म्हणजे दुःख ! जीवन म्हणजे व्यथा ! मंगल, जीवनात आशा-निराशा, यश-अपयश, सुख-दुःख यांची चक्रं फिरायचीच ! तद्वतच झालंय आपलं . . . . "

आणखी किती वेळ असं बडबडत बसलो असतो कुणास ठाऊक ! पण तेवढ्यात मंगल उठली, तिनं स्वतःला सावरलं आणि लग्नाला येण्याचं वचन माझ्याकडून घेतलं. आपल्या पर्स मधून निमंत्रण-पत्रिका काढून तिनं माझ्या हातात दिली. आणि ती निघाली त्यांचवेळी दूर कुठेतरी रेडिओवर एक आर्त गाणं लागलं होतं–

' जीवनाची भैरवी ही एकदा ऐकून जा<br>
तापल्या अश्रूत माझ्या एकदा न्हाऊन जा ।<br>
जा सुखाने दुःख माझ्या संगती ठेवून जा ।<br>
विसर सारे स्वप्न होते, स्वप्न ते विसरून जा ।<br>
सत्य माझे प्रेम हृदयी एकदा पाहून जा<br>
आणि दिधले मी तुला हृदय तू घेऊन जा ।

आणि मंगल निघून गेली. परत मागे फिरूनही न पाहता ! पाठीमागे अंतरीच्या व्यथा ठेवून गेली . .

दुसऱ्या दिवशी मंगलच्या लग्नानिमित्त प्रेझेंट घेऊन मी कार्यालयात दाखल झालो. नववधू मंगलच्या नजरेला माझी नजर भिडली मात्र . . . तिच्या टपोऱ्या निळ्या डोळ्यात टचकन् दोन अश्रूबिंदू चमकले. नंतर तिच्या हातात मी प्रेझेंट दिलं आणि व्यथित अंतःकरणानं तिथून बाहेर पडलो.

मंगलच्या लग्नाला आता एक वर्ष होऊन गेलेलं आहे. समोरच्या कोपऱ्यावरून वळताना ती मला दिसते आहे. संसारात ती पूर्णपणे रमून गेलेली आहे असं जरी म्हणता आलं नाही तरी जुन्या व्यथा आता फिक्कट झाल्या असाव्यात असं तिच्या अंगलटीकडे पाहिल्यावर तरी वाटत आहे. पण असं आता तिच्याकडे पाहण्याचाही मला हक्क नाही याची जाणीव होते आहे. आणि सगळं काही न विसरण्याचा शाप मी माझ्या माथ्यावर वागवतो आहे. मी हा असा भणंग, भिकारी विकल आणि उध्वस्त.

तिला हाक मारावी असं मनातही आलं होतं. पण . . . पण मी हाक मारलेली नाही. मला भीति वाटते आहे, भीति वाटते आहे, असा भंगलेला मी– . . , मला ती माझ्या लग्नाबद्दल विचारील. आणि मग ती जास्तच हळवी होईल गोहवरलेल्या गळ्यानं मला लग्न करून घेण्याबद्दल विनवील. उत्कटतेनं वचन मागेल आणि माझ्याजवळ, वचनासाठीसुद्धा, तिला देण्यासारखं काहीहि नाही, काहीहि नाही . . . . . . . .

# भारतीय लोकसंख्येचा प्रश्न

एस्. बी. आजरी

प्र. ब. वाणिज्य

भारताची लोकसंख्या वाजवीपेक्षा जास्त नसावी असे मत पूर्वीच्याकाळी मांडले जात होते, परंतु आज भारताची लोकसंख्या जरुरीपेक्षा जास्त आहे अगर भारत हा अतिरिक्त लोकसंख्या (over population) असलेला देश आहे हे मत प्रभावी ठरले असून भारतातील अनेक विचारवंतानी व तज्ञांनी ते मान्य केलेले आहे.

भारतातील लोकसंख्या अतिरिक्त आहे ह्या मताच्या समर्थनार्थ जे मुद्दे मांडण्यांत येतात ते असे :-

१) राहणीमान अत्यंत कनिष्ट दर्जाचे आहे :-

आपल्या देशातील राहणीमान इतर प्रगत देशांच्या मानाने कनिष्ट दर्जाचे आहे. आपले दरडोई उत्पन्न अत्यंत कमी म्हणजे ३८५ रु. इतके आहे. अमेरिका व कॅनडा यांच्या दरडोई उत्पन्नांबाबत विचार करावयास गेल्यास एकट्या अमेरिकेचे १३५७३ इतके व कॅनडाचे ८७२४ रु. इतके आहे. यासाठी ज्या देशाचे दरडोई उत्पन्न कमी तसेच राहणीमानही कनिष्ट दर्जाचे त्या देशाची लोकसंख्या अतिरिक्तच म्हणावी लागेल. तसेच आपल्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्याचे प्रमाणही फारसे आशादायक नाही. गेल्या पधरा वर्षात आपल्या देशाची लोकसंख्या ही २॥ टक्क्यानी वाढली पण राष्ट्रीय उत्पन्न मात्र४·२ टक्क्यानी वाढले. आपल्या अपेक्षेप्रमाणे ते ६॥ ते ७ टक्क्यानी वाढावयास हवे होते. ह्याचा परिणाम दरडोई उत्पन्न कमी होण्यात झाला.

२) लोकसंख्या आणि अन्नधान्य यांची विषम विभागणी :-

आपली लोकसंख्या ज्याप्रमाणांत वाढलेली आहे त्या प्रमाणांत अन्नधान्याचे उत्पादन वाढलेलं नाही. म्हणून आपणास आजही प्रतिवर्षी २०० ते २५० कोटी रुपयांचे अन्नधान्य आयात करावे लागते. यामुळेच औद्योगिकरणासाठी आपल्या देशात आवश्यक असणारे परदेशी चलन अन्नधान्यासारख्या गोष्टींवर फार मोठ्या प्रमाणांत खर्च करावे लागते.

३) लोकसंख्या आणि अनुत्पादक ग्राहक यांची संख्या :-

अनुत्पादक ग्राहकांत मुले, स्त्रिया व वृद्ध यांचा समावेश असतो. आपल्या देशातील अशा अनुत्पादक ग्राहकांची संख्या २५.२० कोटी असून तिचे संपूर्ण लोकसंख्येशी प्रमाण ५७ टक्के इतके आहे. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या काळात हे प्रमाण तीन चार टक्यांनी कमी झाले असले तरी लोकसंख्येच्या वाढीमुळे अनुत्पादक ग्राहकांच्या एकूण संख्येतच वाढ झालेली आहे. यावरून असे अनुमान काढतां येइल की आपल्या देशांतील ६० टक्के लोक परावलंबी आहेत तर ४० टक्के लोक उद्योगी आहेत.

४) लोकसंख्या आणि बेकारी :-

बेकार लोकांचे वर्गीकरण दोन विभागांत केले जाते. पूर्ण बेकार ( Unemployed ) आणि अर्धवेळ बेकार ( Under - employed ).

आपल्या देशांतील विशेषत: शेतमजुरांना वर्षातून कांही महिनेच, म्हणजे हंगामाच्या वेळीच रोजगारी मिळते इतर वेळेत ते बेकार राहतात. आपल्या देशांतील एकूण मजुरांपैकी ६९ टक्के शेतमजूर असल्याने अर्धवेळ बेकारांचा प्रश्न तीव्रतेने जाणवत असतो. आपल्या देशात पूर्णवेळ बेकारांची संख्याहि मोठ्या प्रमाणांत वाढलेली दिसून येते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी ९० लाख लोक बेकार होते तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी ही संख्या १.२० कोटीवर गेली होती. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी ही संख्या २॥ कोटीवर जाईल असा अंदाज आहे.

५) शिक्षण, आरोग्य व सोयी यांचा अभाव :-

आपल्या देशातील लोकसंख्या अतिरिक्त असल्याचे आणखी एक कारण म्हणजे आपल्या देशात शिक्षण, आरोग्य व राहण्याच्या सोयी ह्या तुटपुंज्या

आहेत. आपल्या देशांतील शिक्षणाच्या दृष्टीनें विचार केला असतां २६ टक्के लोक साक्षर आहेत तर ७४ टक्के लोक निरक्षर आहेत. आपल्या देशातील लोकसंख्येपैकी २ कोटी १५ लक्ष इतके २० ते १५ वर्षांपर्यंतचे विद्यार्थी आहेत. ह्या विद्यार्थ्यांबाबत सरकारला खूप पैसा खर्च करावा लागतो. सरकार दरवर्षी एका विद्यार्थ्यामागे ९८ रु. खर्च करते. म्हणजेच वर्षाकाठी २१३ कोटी रुपये इतका पैसा खर्च करावा लागतो. इतर प्रगत देशांच्या मानाने हा खर्च अपुरा म्हणावा लागेल.

६) आपल्या देशातील लोकांचे आरोग्य कनिष्ट प्रतीचे होत चालले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आपणाला मिळणारा असमतोल आहार, तसेंच औषधपाण्याच्या सोयीही तुटपुंज्या आहेत. आपल्या देशांमध्यें १९,००० लोकांच्या मागे एक डॉक्टर असे प्रमाण पडते, तर जपान सारख्या प्रगत देशांमध्ये १७०० व इग्लंडमध्ये ७०० लोकांच्या मागे एक डॉक्टर असे प्रमाण आहे. यावरून आपल्या देशांत दारिद्रय आहे हे स्पष्ट होते. ज्या देशांत दारिद्रय आहे त्या देशाची लोकसंख्या अतिरिक्तच म्हणावी लागेल.

लोकसख्या नियंत्रित करण्याचे मार्ग :–

लोकसंख्या नियंत्रित करण्याचे दोन मार्ग आहेत. १) आर्थिक स्थिती सुधारणे २) लोकसख्येच्या वाढीस आळा घालणे.

१) अ) आर्थिक स्थिती सुधारणें :–

लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी आपली आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारली पाहिजे. तसेंच आपल्या उत्पादनांतही वाढ केली पाहिजे. आपल्या देशाचे उत्पादन हे लोकसख्येच्या मानाने अत्यंत कमी आहे. तसेंच आपले राहणीमान सुधारले पाहिजे.

देशातील शेती हा प्रमुख व्यवसाय होय. आपण शेतीपासून जास्तीत जास्त उत्पादन कसे निघेल या दृष्टीनें विचार केला पाहिजे. पण हा मार्ग मर्यादित आहे. कारण आपल्या देशातील जमिनींपैकी ३१ कोटी एकर इतकी जमीन लागवडी खाली आलेली आहे. त्यासाठी शेती उत्पादन हे सखोल प्रयत्नानें वाढविले पाहिजे. पाणी पुरवठा, शेतीच्या रोगावरील औषधें, खतांचे उत्पादन, चांगली शुद्ध बियाणें इत्यादींचा वापर करून एकरी उत्पादन जास्तित जास्त वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ब) उद्योगधंद्यांची वाढ करणें :–

उद्योगधंद्यांची वाढ करणे हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. नैसर्गिक संपत्तीचा अधिकात अधिक उपयोग करून घेतला पाहिजे. असे केले तरच उद्योगधंदे वाढतील. तसेंच ज्या ज्या दृष्टीनें राष्ट्रीय उत्पन्न वाढेल त्या त्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.

२) लोकसंख्येच्या वाढीस आळा घालणें :–

लोकसख्येच्या वाढीला आळा घालण्यासाठी लोकामध्यें जागृती निर्माण केली पाहिजे. तसेंच लोकसंख्ये बाबत नियोजन करणेहि आवश्यक आहे. लग्नाची मर्यादा कायद्याने वाढवली गेली पाहिजे. तसेंच दोन भावंडामधील अंतरही वाढविले पाहिजे. गर्भपातास कायद्यानें संमति दिली जावी.

–: भारत सरकारचे लोकसंख्येबाबत धोरण :–

१९४७ पर्यंत ब्रिटीश सरकारनें वाढत्या लोकसंख्येबाबत कोणतेच धोरण आखले नाही. कारण त्यांना तशी जरूरीच भासली नाही. पण १९४७ नंतर म्हणजेच देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकारचे वाढत्या लोकसंख्येकडे लक्ष गेले. लोकसख्या नियंत्रित–करण्यासाठी "राष्ट्रव्यापी मोहीम" घेण्यात यावी असे ठरले. त्यासच कुटुंब–नियोजन असें म्हणतात.

भारताने लोकशाहीचा स्वीकार केलेला असल्यामुळे लोकांचे मूलभूत हक्क अबाधित ठेऊन ही योजना करावी लागत आहे. सक्तीऐवजी सहकार्यावर ही उपाययोजना आधारणे आवश्यक असल्यामुळे शिक्षण प्रचार, मार्गदर्शन आर्थिक मदत इत्यादी मार्गांचा अवलंब करावा लागत आहे. सरकारने जे धोरण स्वीकारले आहे त्यानुसार उपाय योजून लोकसंख्येच्या प्रश्नाची सोडवणूक केली जात आहे. तथापि ह्या पुढील काळात कुटुंब–नियोजन व संतति नियमन ह्यावर सरकार आणि समाज ह्यांना जास्त लक्ष द्यावे लागेल. आपल्या सरकारकडून प्रयत्न केले जातातच, परंतु जनतेनेहि कुटुंब–नियोजनाचे महत्व लक्षांत घेऊन लोकसंख्या मर्यादित करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. अशा रीतीने सरकार आणि समाज या दोघांनी आपआपली जबाबदारी योग्य तऱ्हेने पार पाडली तरच लोकसंख्येचा प्रश्न उग्र स्वरूप धारण करणार नाही आणि भारतीयांचे जीवन सुखी आणि समृद्ध होऊ शकेल.

# आपणाला किती झोपेची आवश्यकता आहे?

संकलन : अलका मनोहर पत्की
प्र. व. साहित्य

झोप ही अगदी खरीखरी विश्रांती आहे. रोज रात्री आपल्याला निवांत झोप मिळते म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी ताजेतवाने आणि उत्साही असतो. एखाद्या वेळी आपल्याला झोपच आली नाही तर? निद्रानाशाची कल्पनाही भयानक वाटते. म्हणून तर आपले झोपेवर फार प्रेम असते.

ब्रिटनमधल्या एका धनाढ्य सार्वजनिक हाय-स्कूलचे मुख्याध्यापक श्री जॅक मेयर यांना आपली व्यवस्थापन आणि अध्यापन ही दोन्ही कामे त्यांच्या नेहमीच्या कामाच्या वेळात होऊ शकत नाहीत असे आढळून आले. त्यांनी आश्चर्यकारक परंतु तार्किक गोष्ट केली. त्यांनी आपल्या निद्रेला विराम दिला! वर्षाला सत्तावीस हजार रुपये फी असलेल्या सोमरसेट मधील मिल्फील्डचे मुख्याध्यापक श्री. मेयर गतवर्षीच्या ऑगस्टपर्यंत म्हणजे सुमारे सतरा महिने दिवसातील चावीस तासांपैकी तेवीस तास जागे असत. व अशा तऱ्हेने त्यांनी आपले १५ वर्षांचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्ण केले. त्रेसष्ट वर्षे वय असूनही दमदार असलेले हे गृहस्थ गेल्या सात वर्षात आजारी पडले नाहीत. अविश्रांत श्रम करणारे हे गृहस्थ म्हणतात, "दहा मिनिटाची एक डुलकी मला कित्येक तास उत्साहीत करते. कधी कधी मी उभ्याउभ्यासुद्धा झोपतो"

पन्नास वर्षांच्या प्रौढ वयातील सतरा वर्षे बेसावध अवस्थेत घालविण्यास आणि झोपेचे गुलाम बनण्यास श्री मेयरनी नकार दिला आहे. आपल्यापैकी अनेकजण अर्धपणे असे समजतात की, सात किंवा आठ तासांच्या रात्रीच्या झोपेची आपणास आवश्यकता आहे. आपणास लहानपणापासून आरोग्यासाठी व कल्याणासाठी झोप आवश्यक आहे असेच सांगितले जाते.

झोप या विषयावरील जगातील प्रमुख लेखक डॉ. विल्यम डेमेंट म्हणतात, 'प्रत्येक प्रौढ माणसाला रोज रात्री आठ तास झोप आवश्यक असते या वचनाला साधार असा वैद्यकीय किंवा मानसिक पाया नाही. प्रकृतीचे नुकसान न करता अनेक लोक यापेक्षा कमी झोप घेऊ शकतात."

आपल्या आयुष्यात प्रत्येक आठवड्यात मिळालेल्या ह्या जादा वेळेचा तुम्ही अनेक प्रकारे उपयोग करू शकाल. कामाच्या ताणामुळे सोडून द्यावा लागलेला एखादा खेळ किंवा छंद तुम्ही पुन्हा सुरू करू शकता. अधिक गुणवत्तेसाठी प्रयत्न करू शकाल. एखादी भाषा शिकू शकाल किंवा आपले घर सुशोभित करू शकाल. रात्री दोन तास झोप कमी करण्याची तुमच्या शरीराला तुम्ही सवय लावलीत तर असा रिकामा वेळ तुमच्या आहे. आठवड्यातील असा चौदा तासांचा दिवस तुम्हाला कोणत्याही जादुपासून मिळवू शकणार नाहीत. तो आपल्या इच्छेप्रमाणे कोणत्याही कामासाठी तातडीने खर्च करता येईल. हे स्वप्न सत्यात उतरू शकते. आवश्यक व महत्वाच्या उद्योगधंद्यातील अनेक थोर पुरुषांनी ही किमया करून दाखविली आहे.

लिंडन जॉन्सन् आपल्या व्हाईट हाऊसमधील कार्याच्या काळात रात्री ५ तासापेक्षा कमी झोप. चौसष्ट वर्षांचे मेरलीन डायट्रीच तर फक्त रात्री चार तासांचीच झोप घेतात. विमानमार्ग व फिल्म जगातील वजनदार परंतु अत्यंत तऱ्हेवाईक समजले गृहस्त हॉवर्ड ह्यूज झोप अनावश्यक समजतात. पहाटे तीन वाजताच त्यांना व्यावसायिकांचे फोन येतात आणि त्यासाठी त्यांना तशा अपरात्रीच्या वेळी कुठल्यातरी एकाकी रस्त्याच्या कोपऱ्यावर आपल्या कामास याच्या निमित्ताने बोलणी करावी लागत. श्री ह्यूज ह्यांच्या मते दिवस आणि रात्र यांना अर्थ नाही. कोणत्याही हवामानात दिवस अथवा रात्र काळ हा कामासाठी व कार्यासाठी आहे. ब्रिटनच्या अहुसष्ट वर्षे वयाच्या आनंदी कर्वेन मदर तीस वर्षांच्या कालखंडात रोज रात्री जास्तीत जास्त केवळ सहा तासच झोप

असे. तिची दिनचर्या सकाळी सहाला सुरु होई आणि मध्यांतरा संपे. विणकाम करावे, नातवंडाना भेटावे असे वाटण्याच्या वयाच्या अवस्थेत क्वीन मदर आपल्या कचेरीतील कामात गुंतलेल्या असतात. पन्नाशीच्या आसपास ब्रिटनचे मुख्यप्रधान हॅरॉल्ड विल्सन न थकता दिवसात अठरा ते वीस तास काम करतात. चर्चिल आणि मॅकमिलन यांच्या प्रमाणेच त्यानी कागदपत्राचे ढीगच्या ढीग अगदी बिछान्यातही वागविले आणि सुटीच्या दिवशीही पहाटेपर्यंत काम केले.

दिवसात केवळ आठ तास काम करण्याचे ठरविणारांना सन्मान्य प्रतिष्ठा मिळत नाही असें बेटी डेव्हिस् आणि त्सा त्सा गॅबर या अभिनेत्यांना आढळून आले. डेव्हिस म्हणतात, बऱ्याच रात्री मला चार तासांची झोप मिळते पण आयुष्यात अनेक गोष्टी करण्यासारख्या आणि पहाण्यासारख्या असताना झोप येतेच कशी ? रिचर्ड विड्मार्क, टेलिव्हिजन प्रख्यात डेव्हिड फ्रॉस्ट, नोअेल कॉवर्ड, शल्य विशारद ख्रिश्चन बर्नार्ड, राष्ट्रसंघाचे सेक्रेटरी उ थांट या सर्व प्रसिद्ध व्यक्तीनी आठवड्यात मिळणाऱ्या ह्या जादा दिवसाच्या प्रत्येक मिनिटाचा उपयोग करुनच आपल्या कारकीर्दी यशस्वी केलेल्या आहेत. त्यांनी हे कसे केले ? ते अतिमानुष किंवा दैवी लोक नाहीत. त्यांच्यापैकी काहीजण मध्यम वयीन असूनही उत्साह आणि सामर्थ्य यामुळे ते असामान्य ठरले आहेत.

नेहमीपेक्षा अधिक उत्साहाने जीवन कठण्याच्या माणसातील या सामर्थ्याने अनेक वैद्यकीय तज्ञांना गोंधळात व घोटाळ्यात टाकले आहे. झोप व विश्रांती यावर अधिकारवाणीने लिहिणारे लेखक डॉ. नाथानियल क्लाइतमन झोपेचा संबंध मानसिक समाधानाशी जोडतात. बेजबाबदार व्यक्ती, जागरूक व्यक्तीपेक्षा जास्त निद्रा घेते. रोज रात्री आठ तास झोप घेणे म्हणजे आपल्या मौल्यवान वेळेचा अपव्यय करणे हा गुन्हा होय. इतर मार्गानी भरपाई करून झोप कमी करता येते, असे आता वैद्यक शास्त्राचेही मत होऊ लागले आहे. यासाठी दिवसा काढलेली एखादी डुलकी अत्यंत सोयीस्कर व परिणामकारक होते असे दिसते.

इतर परिस्थिती कायम असेल तर दिवसाच्या वीस मिनिटांच्या झोपेचे मूल्य रात्रीच्या एक तासाच्या झोपेइतके असते हे डॉ. लॅरिन्स इ. मोरहाऊस यांनी कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत घेतलेल्या चाचणीवरून दाखवून दिले आहे. जेवण व अल्पोपहार यानंतर तुम्हाला दहा दहा मिनिटांची डुलकी काढता आली तर तुमच्या आरोग्याच्या आणि मनस्वास्थ्यांच्या दृष्टीने हितकारक असते, असे डॉ. मोरहाऊस यांचे सांगणे आहे.

हॅराल्ड विल्सन पाहिजे तेव्हा अगदी थोड्या क्षणांची एक डुलकी काढून ताजेतवाने होत. क्वीन मदर आपल्या कामासाठी भेटायला जाताना आपल्या मोटारीत झोपत. तर रिचर्ड विड्मार्क चित्रपटांच्या चित्रीकरणांच्या मधल्या वेळेत डुलकी घेत. ह्यामध्ये नाविन्य असे काही नाही. नेपोलियन त्याच्या घोड्यावरील जीनवर झोपत असे. संशोधक थॉमस एडिसन अल्पोपहारानंतर टेबलावरच चार तासांची झोप घेत असे त्सा त्सा गेबर म्हणते की लहानशा डुलकीमुळे मुलींची त्वचा नितळ रहाते, सुरकुत्या निर्माण होत नाहीत.

तुमच्या जीवनात आठवड्यात जादा दिवसाची भर घालण्याची आशा फलदायक आहे. परतू ती भर घालताना खबरदारी घेणे आवश्यक आहे. झोप हा जीवनाप्रमाणेच मूलभूत आहे. अन्नाशिवाय मनुष्य सहा आठवडे जगू शकला तरी झोपेशिवाय दहा दिवस जगू शकणार नाही. उतार वयाच्या किंवा अनियमित प्रकृतीच्या माणसांनी वैद्यकीय सल्याशिवाय झोप कमी करणे शहाणपणाचे होणार नाही. जरी तुम्ही सदृढ असला तरी प्रत्येक कृती काळजीपूर्वक केली पाहिजे.

तुमची झोप एक तास कमी करा आणि पहा कसे वाटते ते ? जर तुम्ही गजराशिवाय वेळेवर उठू शकला आणि कामाच्या वेळी जर तुम्हाला झोप आली नाही तर हा नवीन अनुभव तुमच्या शरीरास आनददायक होईल.

जर तुम्ही अल्पोपहारानंतर १५ मिनीटांची डुलकी घेऊन उठलात तर दुपारी न झोपणाऱ्या तुमच्या मित्रांपेक्षा तुम्ही १५टक्के अधिक कार्यक्षमतेने काम करू शकाल. विश्रांतीचे तंत्र योगासारखे आहे. जॅक मेयरनी तरुणपणी भारतात योगसाधना केली. "थोड्या काळात भरपूर विश्रांती घेण्याचेमी योगसाधनेमुळे शिकलो," असे ते म्हणतात. लोक आपला बहुमूल्य वेळ झोपेत घालवितात हे खरे आहे. तथापि मी तसे म्हणणार नाही. तरुणांना झोप आवश्यक आहे. मला वाटते लहानपणी मला असे करता आले नसते.

एके दिवशी काही काम नसल्यामुळे मी सात तास झोप घेतली आणि उठल्यानंतर मला मनस्वी वाटले असे श्री. मेयर यांनी नमूद केले आहे.

# 'आनंदभैरवी'तील प्रेमकविता

कु. मंगला पेडणेकर
प्र. व. साहित्य

आधुनिक मराठी काव्यसृष्टीत केशवसुतानंतर दिव्य प्रीतीगीते गाईली ती प्रामुख्याने गोविंदाग्रज, तांबे तसेच माधव ज्यूलियन, यशवंत गिरीश आदी रविकिरणमंडळातील कवींनी अन् पुढे अनिल, पु. शि रेगे वगैरेंनी. तांब्यांनी सफल प्रीतीचा मधू काव्यघटातून रसिकांना दिला पण गडकऱ्यांनी मात्र विफल प्रीतीचे कडवट सूरच कवितांतून प्रकट केले. रविकिरण मंडळाच्या प्रेमकाव्यजलावर मधून मधून निराशेचा गोड काळीमा पसरलेला दिसून येतो तर तांब्यांच्या काव्यजलावर आशेचे मधुर चांदणे वर्षिले आहे. ' प्रणयपंढरीचा वारकरी असलेल्या माधव ज्यूलियनांनी प्रेमाचे नवीन तत्वज्ञान निर्माण केले. त्यांच्या मते जीवनामध्ये स्त्री ही विविध नात्यांनी यायला हवी. अनिलांनी आपल्या काव्यातून 'प्रेम आणि जीवन' याबरील निष्टा व्यक्त केली तर मंचककवी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या रेगे यांनी दैहिक प्रीतीतीलही सौंदर्य उकलून दाखविले आहे. परंतु १९३२ च्या दरम्यान मराठी काव्यात निर्माण झालेली ओहोटी नाहीशी करुन काव्यक्षेत्रं समृद्ध करण्यासाठी कुसुमाग्रज व बोरकरच पुढे आले. कुसुमाग्रजांनी अनुकरणाची जुनी मळवाट न चालता नव्या पाऊल वाटेने जाण्यातच समाधान मानले. अनुकरण करताना बोरकरांनी मात्र खास स्वत:ची अशी सौदर्यदृष्टी भान ठेवून जपली आहे.

प्रतिभा, जीवनसंगीत, दूधसागर या काव्यसंग्रहातून स्पर्श लाभला तो ' आनंद भैरवीत ' आपल्या भावसंगीताची भैरवी त्यांनी आनंदाने गाईली आहे. ' आनंद भैरवी 'तील या कवितेचेरूप न्याहाळता केवळ प्रेमकवितांचीच सीमारेषा आखून आनंद भैरवीतील कवितांचे इथे मूल्यमापन करावयाचे आहे. आपल्या प्रेमभावांना कवितेची कळा कशी लाभते ते सांगतांना बोरकर म्हणतात, ' प्रीतीच्या जीवनउत्कटप्रत्ययाशिवाय माझ्या नंदनवनाची दारे मला उघडी होत नाहीत" रती हा जिचा स्थायिभाव आहे अशा 'आनंदभैरवी'तील प्रेम कवितेत प्रेम भावनेतील विविध छटा दिसून येतात त्यांच्या शृंगारकवितेचे रूप माझी बेगम ' मध्ये पहायला मिळेल. निखळ प्रेमभाव असलेली, निसर्ग आणि प्रेम यांची संमिश्र छटा असलेली दैहिकता नाकारून मानसमीलन आगळ्या स्तरावर व्यक्त करणारी, सुनीत स्वरुपाची रचना असलेली राष्ट्रीय कार्याची पार्श्वभूमी लाभलेली असे स्थूलत: त्यांच्या प्रेमकवितेचे वर्गीकरण करता येईल.

' आनंदभैरवी ' तील निखळ प्रेमभाव व्यक्त करणाऱ्या काही कवितांपैकी आसक्ती व विरक्ती या चरणव्दयांनी अखेरपर्यंत चालत आलेली 'तुझ्याजवळी' ही कविता लक्षणीय आहे. एकाच अंत:करणातील विरक्ती आणि आसक्ती या भावनांचा हृदयरंजक आविष्कार इथे झालेला आहे. तिच्या सहवासात प्रियकराच्या मनात विरक्तीची जाग असते पण दूरत्वात मात्र लागलीच आसक्तीचा उदय अंत:करणात होतो. प्रेयसीचे व्यक्तिमत्व अशी विचित्र ' भुलावणी ' पाडणारे आहे. म्हणूनच प्रियकर म्हणतो

'कोण अगी सांग तू गे सहवासी छेडणारी
आणि वेडचा स्वप्नभासी दीसरात वेढणारी'

हाच गोड विरोधभाव ' डोळे तुझे बदामी ' या कवितेत दिसून येतो. नयनांच्या संकेतामध्येही एक प्रकारची धुंदी असते. हे प्रेयसीचे बदामी डोळे भुलवून मारणारे आहेत. गनिमी कावा साधणारे आहेत. एकूण हे तिचे ' लबाडलुच्चे डोळे ' सतत फसवीत असतात पण या फसवेगिरीतील आनंद काही वेगळाच. या डोळ्यांचे वर्णन

' सुल्तान मोगली हे डोळे तुझे बदामी '

या चरणात दिसते. पण हे डोळे नाटकी अन् इमानीही आहेत. एकंदरीत या कवितेत नयनांचा उत्सव साजरा झाल्याचे दिसून येते. ' खाईतला स्वर्ग ' या

कवितेत विरहातील व्यथा ही अमृतमय झालेली दिसून येते. या कवितेत अखेरपर्यंत एक विरोधी भावलय साधली आहे. प्रेयसीनें प्रियकराच्या अंतःकरणात जी नेत्ररत्ने खोवली होती ती आज वियोगामुळे पेटू लागली आहेत. तिने अंगाला-रुमालाला केवडा लावला होता त्यातूनच आज नागांच्या फडा फुत्कारू लागल्या आहेत. चांदीच्या प्याल्यातून तिने जे जुईचे पाणी दिले त्याचीच वारुणी झाली आहे. तिने ओठावर उमटवलेली पुष्पमुद्रा आज तप्तमुद्रा झाली आहे. हा प्रियकर विरहातही तिचे स्मृतीधन घेऊन जगत आहे. प्रियकर जेव्हा

' राहुनी खाईत या मी स्वर्ग येथे पाहतो
कालाकुटी पोहताही अमृताने नाहतो '

असे उद्‌गार काढतो तेव्हा विरहातले दुःख किती उदात्त असते त्याचा प्रत्यय येऊन जातो. ' खाईतला स्वर्ग ' या कवितेत विरही प्रियकराच्या भावनांना शद्बाकार दिला आहे तर ' विफलतेतील सफलता ' या कवितेत बोरकरानी ' वैफल्यात सफलता ' मानणाऱ्या प्रीतिपूजक प्रेयसीची करुणोदात्त भावगाथा गायली आहे. प्रीतीमधील एकनिष्टता, प्रियकराबद्दलची सर्व समर्पणशील भावना ' विफलतेतील सफलता ' या कवितेत दिसून येते. प्रियकरासाठी जिवाच्या पायघड्या करून ती वाट पहाते. तो थांबेल अशी एक वेडी आशा तिच्या मनात होती पण तिच्या भाळी नियतीने दुर्दैवाचा काळिमा फासली. तिचे हृदय तो तुडवून गेला. असे असले तरीही त्याच्याबद्दलची तिची जी एकनिष्ठ भावना होती ती चिरंजीव होती. म्हणूनच ती अखेरीस म्हणते–

' सफलतेत विफलता शेवटी दिसेल का पण तुला ?
विफलतेंत सफलता पाहणे स्वभाव आमुचा खुळा !

गोड काळिमा पसरलेली ही एक उदात्त विरह-भावना आहे. ' आणखीन काय ' या कवितेत प्रेयसीच्या व्यक्तिमत्त्वामधील सामर्थ्य टिपले आहे विरोधा-भासाच्या सूत्रात गोवलेली ही एक हृदयगम अशी कविता आहे. हिच्या डोळ्यामध्ये बदामी डोळ्यातील उन्मत्त भाव दिसून येत नाही. तर तिचे डोळे हे ' कांचनाची निरांजने ' आहेत. तिच्या डोळ्यामध्ये जाळण्याचे आणि संजीवनी देण्याचेही सामर्थ्य आढळून येते. तिच्याशी खूप खूप बोलण्याच्या उद्दिष्टाने आलेला हा प्रियकर तिच्यापुढे

' मद्द वैभव असूनही माझा व्हावा नि पाय '

अशी स्पष्ट कबुली देतो. हार खाण्यातही एक प्रकारचा आनंद मानणारा हा प्रियकर आहे.

निसर्ग आणि प्रेम यांच्या संमिश्रछटा असलेल्या कवितांमध्ये ' नवल ' या कवितेत रात्रीच्या पार्श्वभूमीवर प्रीतीतील एकरूपता ' रात निळी रात निळी ' या कवितेत प्रकटली आहे. उत्कट प्रीतीच्या धुंदीत दोघेही

' गात्रातून विश्व पिऊ
नेत्रातून विश्व स्त्रवू
मिसळू रसराग नऊ
रात्रीच्या पुष्पदळी

हा अनुभव घेऊ इच्छिताहेत. बोरकरांना नील-रंगाचे अधिक आकर्षण आहे. रमणी आणि धरणी या कवितेत दोहींच्या तुलनेतून रांगड्या शेतकरी तरुणाची प्रीती चितारली आहे. तर ' एक सायंचित्र ' या कवितेत निसर्गाच्या पार्श्वभूमीवर प्रियकर व एक रानकिशोरी यांच्यातील प्रेमभावाभिव्यक्ती झाली आहे. ' खिडक्यावर वाजे वारा ' या कवितेत वर्षाऋतूच्या पार्श्वभूमीवर निसर्गातील आत्यंतिक उन्माद आणि अंतःकरणातील उन्माद हा टिपलेला आहे.

बोरकरानी शारीरिकता स्वीकारली आहे. किंबहुना दैहिक स्पर्शाला काव्यातून पावनत्व दिले आहे. या स्पर्शावर त्यांनी पापाचे काळे शिक्के कधी मारलेले नाहीत ' हरिच्या स्मरभुवनी ' या कवितेत कृष्ण-गोपींचे प्रेम कथाच प्रकटली आहे ' समजावणी ' या कवितेत इंद्रवनीच्या सौंदर्याचा ध्यास धरणाऱ्या प्रेयसीची समजूत घालणारा प्रियकर आढळतो. बोरकरांच्या प्रेमकवितेत स्पर्शसर्गातातले ऐश्वर्यही प्रत्ययास येते. अभिलाषेच्या रक्तात न्हाऊन निघालेली कविता अस-ल्यामुळे तिचा रंग कधीच विटला नाही. शारीरिक अनुभव किंवा स्पर्श अनुभव व्यक्त करताना बोरकर जितके उंच जातात तितकेच उंच, मानसमीलन व्यक्त करतानाही जातात याचा प्रत्यय ' रुमडाला सुम आले ग ' या कवितेत येतो. या कवितेतील प्रियकर अखेरीस म्हणतो

' आलिंगन चुंबनाविना हे
मीलन अपुले झाले ग
पहा, पहा, परसात हरीच्या
रुमडाला सुम आले ग '

या संपूर्ण कवितेतच शरीरवासनेला तिलांजली मिळून विशुद्ध प्रीतीच प्रवाहित झाली आहे जणू उत्तान उथळ शृंगाराच्या माथा विशुद्ध प्रीतीने पाय ठेवला आहे. एकंदरीत ही कविता ' भावतुळसच ' आहे असे म्हणावे लागेल.

सुनीत स्वरुपाच्या रचनेमध्ये ' वृद्ध होऊ तेव्हा ' या कवितेमध्ये स्त्री ही विविध नात्याने जीवनात आली पाहिजे हा व्यापक दृष्टिकोन प्रकटला आहे. सुनीत स्वरुपाच्या ह्या दोनच कविता आहेत. ' ताज ' ह्या कवितेत शहाजानच्या आत्मनिवेदनातून प्रीतीतील कारुण्यपूर्णता व्यक्त केली आहे. 'साबरमतीच्या काठी' आणि 'सोळा वर्षानंतर' या कवितामधून राष्ट्रीय कार्याच्या पार्श्वभूमीवर पतीपत्नीच्या प्रेमभावना व्यक्त झाल्या आहेत.

अशी ही निविध आवरणे येणारी ही बोरकरांची प्रेमकविता पाहाता, करंदीकर, मर्ढेकर, पु. शि रेगे. पाडगावकर आदी कवींनी मराठी प्रेम कवितेला जे काही दिले त्यामानाने बोरकरांनी फारसे काही दिले नाही असे म्हणावे लागते. करंदीकरांनी आदिताल आळविला. मानवी रक्तातली लाल लय बंडखोरपणाने अक्षर केली. जीवनातील निर्मितीचे ' धृपद ' गाईले. करंदीकरांची

' मदलेल्या या छंदामध्ये
तुझा हालू दे मदाळ अंक '

ही अर्थगर्भ अभिव्यक्ती बोरकरात दिसणार नाही. मर्ढेकरांच्या कवितेत तर चक्क सेंद्रिय उल्लेख आढळतात. बोरकरांच्या कवितेत स्पर्शभावना आढळतात. बोरकर हे शब्दांचे आणि संगीताचे नादी आहेत. बोरकर काही ठिकाणी अगदीच स्थूल अविष्कार करणारे वाटतात. उदा. ' समजावणी ' या कवितेमध्ये नुसताच विस्तार आढळतो. Creation मधील विकास त्यात नाही. ' रमणी आणि घरणी ' ही वाढविलेली कविता वाटते. ती रसभाव फुलीं फुलली नाही. पाडगावकरांनी प्रेमकाव्याला नवीन वळण दिले. रविकिरणमंडळ काळात प्रेयसीची पायकी करण्यात प्रियकरास आनंद वाटे पण पाडगावकरांचा प्रियकर म्हणतो–

' माग हवे ते गडे तू
माझे पंख मागू नको
दान स्वप्नांचे देऊन
जाग माझी मागू नको '

पाडगावकरांचा प्रियकर हा ' जवळ ... जवळ ये पण सीमेचे भान असू दे ' असे चक्क बजावतो. हे नाविन्यही बोरकरांत नाही. बोरकरांच्या प्रियकराने स्वतःचे अस्तित्वच हिरावून टाकले आहे. पाडगावकरांचा प्रियकर स्वतःच्या अस्तित्वाला जपणारा आहे.

एकंदरीत बोरकरांनी मराठी प्रेमकवितेला नवे काही दिले नाही तरी आपल्या प्रेमानुभूतीशी प्रामाणिक राहून, स्पर्शभावनेला पवित्र मानून काव्यनिर्मिती केली हे त्यांचे मराठी प्रेमकाव्याला देणेच म्हणावे लागेल.

□ □ □



# विज्ञान देवो भव

**कृष्णा खामकर**
पदवीपूर्व साहित्य

स्थळ : ( एका सामान्य घरातील बैठकीची खोली. सर्व साहित्य जुन्या पद्धतिचे, भितीवर देवदेवतांचे फोटो, एका कोपऱ्यात एक गावठी पलंग. ओटीच्या समोरून रस्ता जातो आहे. उलट बाजूस घरात जाण्याची वाट आहे. समोरच्या भितीत एक खिडकी, खिडकीतून परसदारातील तुळसीवृंदावन दिसते आहे घरातील कुटुंब प्रमुख नामदेव, वय सुमारे ५० वर्षे. अंगावर नेसतं धोतर व वर बंडी, त्याने नुकतेत स्नान केले आहे केस अस्ताव्यस्त. कपाळावर गंधाचा टिळा हातात पेटलेल्या उदबत्त्यांचा झुबका. )

नामदेव : ( प्रवेश करत )

आपुलिया बळे नाही मी बोलत
सखा कृपावत वाचा त्याची ।
साळुंका मजळ बोलतसे बाणी
शिकविता धनी वेगळाची ॥

( हा अभंग म्हणत एका फोटोपुढे उदबत्त्या ओवाळतो. त्यातल्याच एका फोटोच्या कोपऱ्यात खोचूच ठेवतो ) ( कांही वेळाने ) शंकर, आर शंकरा-- काय करतुयास ? कवाधरनं हाका मारतुया--

शंकर : काय बाबा ? काय काम आहे ?

नामदेव : आरं दिस उगवून कासराभर आला तू रानात कवा जायचास ? काय मरदानु तुमची कामं ! शिकल्याली पोर तुम्ही--

शंकर : एवढा चहा घेकला कीं जाणारच होतो, पण...

नामदेव : काय मरदानु ते तांबड पानी पितासा! आपली न्याहरी करून घ्यावी येरवाळी.बरं, ते न्हाउदे--

शंकर : पण बाबा, आज मी तालुक्याला जाव म्हणत होतो एजिन आणायच आहे. बी. डी. ओ. ऑफीसात आज बोलाबल आहे.

नामदेव : कसलं याड डोस्क्यात घेतलंयस कुनाला दखल ! आरं, इंजनानं काय व्हतयां ? कवाबी आपली म्वॉट बरी आन् एकांदा बैल घेबाबा मर्दा. सम्दं आकरितच झालया, रेडिओ काय, सिनिमा काय, कायबी करा तुमचं तुमी-- पर, मी आज पंढरपूरला जायाचा हाय. आषाढी एकादस् उद्यावर आलीया. मला एक चाळीस रुपय दे, आन तुला कुट जायाचं तकडं जा

शंकर : पण बाबा, तुम्हाला चाळीस रुपये दिले तर मला एंजीन साठी पैसे कमी पडतील.

नामदेव : लई शाना हू नगस. वर्सातनं एक डाव देवाला जायाच तर त्यात तुज इंजान आडव आनू नगस.

शंकर : बाबा मी यंदा एजिन आणणार. विहिरीवर बसवणार. त्या रामू पाटलान् बघा बरं कसं आपल्या विहिरींवर बसवल आहे. तो वर्षातून दोन-दोन, तीन-तीन पिकें काढतो ! आजुबाजूचे सगळे लोक पुढे गेले, आपण मात्र मागे राहिलो-

नामदेव : आर् कुंट माग आन् म्होर जातुइस, ( वर हात करून ) तेज्या मनात पायजे तर चार घास पोटात पडतील. लइ शाना हू नगस, गुमान पैस देवून टाक. मला म्हाताऱ्याला एवढ्या थोडक्यासाठी परस्वाधीन करतुइस काय ?

शंकर : ( आतल्या पेटीकडे बोट दाखवीत ) ते सगळच पैसे घ्या आणि कुठ पंढरपूरला, काशीला जायच तिकड जावा.

नामदेवचा मित्र गणूबुवा. नामदेवच्याच वयाचा. तोही नामदेव बरोबर पंढपुरला जाणार आहे. तो प्रवेश करतो.

गणबुवा : नामदेव. ए नामा, हाईसका घरांत ?

नामदेव : ये गणबा ऐक ह्यो शाना शंकऱ्या काय म्हंतुया. पंढरीला जायाची गोष्ट काढली, तर इंजान घ्याबं हाय, पैसं न्हाइती म्हतुया-

गणूबुवा : शाप तोंडाव न्हाइ म्हंतुया ? आर्, शंकर चांगला शिकल्याला न्हाईस न्हव तू ? आसं येडपागत का करतुयास ?

शंकर : नव्या काळाची पवाल ओळखण हे तुमच्या दृष्टीनं वेडच आहे गणूकाका ! शेतकऱ्याच्या जीवनात कोणत्या वेळेला काय महत्वाच आहे हे ओळखलं पाहिजे आपण. एंजिनचा उपयोग आत्ताच महत्वाचा आहे. उन्हाळ्यात त्याचा काय उपयोग ?

नामदेव : (उसळून) आन् ठरलेली देवाची वारी महत्वाची न्हाय वाटतं ? आर देवाला कमी मानतायसा एवढं का मातलायसा ? देवानं दिल तर मानसाला मिळल. इक्ती गुर्मी तुला कुटनं आली ?

शंकर : तुमच्या आसल्या खुळ्या वागण्यानच आली ? देवाधर्माच्या खुळचट कल्पनामुळच आपण मागे राहिलो.

नामदेव : लइ फाजिलपणानं बोलू नगस. जीव उपटून टाकीन.

शंकर : कशाला त्रास करुन घेताय, मी असल्या घरात रहातच नाही.

गणूबुवा : बापाला उलट बोलतइस मर्दा, शिकून लई शाना झालास.

शंकर : तुम्हाला आमच्या यातना कळणार नाहीत गणूकाका. तुम्हीही त्यांच्यातलेच, कामधंदा नसला म्हणजे पढंपूर सुचतं, सारं सुचतं.

नामदेव : गणूला काय बोललास तर थोबाड फोडून टाकीन. देवाच्या कामात आडवा पडतुयास कुठं फेडशील हे पाप ? चल चालता हो माझ्या म्होरनं–

शंकर : कायमचाच जातो तुमच्या पुढून. मी रहातोय कशाला इथं. (तर तरा निघणार एवढ्यात पाण्याची घागर घेऊन पारु बाहेरुन येते. तिथल्या वातावरणाने भयभीत होते)

गणूबुवा : माग फिर पोरा. तुझ्या आईची शप्पथ हाये–

शंकर : त्या माऊलीची कशाला शपथ घालता गणूकाका ! देवाधर्माच्या नादात बावाना आईची आठवण मुद्धा राहिली नाही. औषधावाचून तळमळत असताना इकडे आईचा प्राण गेला त्यावेळी हे पंढरपूरच्या वाळवंटात कथा कीर्तनात रंगून गेले होते ! शेवटी काय मिळालं ?

पारु : तुमी आता एक शब्दही बोलू नका. मामंजीना बोललेलं मला खपणार नाही, सासूबाई गेल्या हे आपलं दुर्दैव आणि त्यांचही. तेव्हापासून त्यांनी प्रपंचातून सगळं मनच काढून घेतल आहे. त्यांच्या मनाला एऊन जाऊन वारीचाच विरंगुळा. त्यातही आपण मोडता घालयचा म्हणजे–

गणूबुवा : शाबास पोरी ! आपल्या सासूचं नाव राखलस. वडिलकीचा मान राखनं हे तर पोरीबाळाचं कर्तव्य असत.

शंकर : हो, हो... आशानी काही प्रश्न सुटत नसतो.

पारु : प्रश्न मी सोडविते. ( हातातील दोन सोन्याच्या बांगड्या भराभर काढते. त्या नवऱ्यापुढं ठेवून ) हे घ्या, याच्यावर पैसे काढून तुम्हाला कांही कमी पडतील ते घ्या. आणि पेटीतल काय लागतील ते मामंजीना द्या. नव्या काळातले एंजिनही आले पाहिजे आणि जुन्या काळातील श्रद्धाही टिकली पाहिजे. देवासारख्या वडिलधाऱ्या माणसाना घरांत समाधान मिळाले नाही तर त्यांच्या शापाने त्या एंजिनाचेही फुटून तुकडे तुकडे होतील–

